शनिवार, 05 नोव्हेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 87
RNI : MAH/2021/82566

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 05 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-87 ● RNI : MAH/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

महत्वाची बातमी

## सुषमा अंधारेंचे अण्णा हजारेंवर गंभीर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या 'जनलोकपाल' आंदोलनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच सरकार उलथवून टाकण्यासाठीच अण्णा हजारेंनी जनलोकपाल आंदोलन केलं, असा गंभीर आरोप केला. तेव्हा आंदोलन करणारे अण्णा हजारे आज एवढे प्रश्न आहेत, पेच निर्माण होत आहेत, पण त्यावर चकार शब्द बोलत नाहीत," असे म्हणत अंधारेंनी अण्णा हजारेंवर निशाणा साधला. त्या महाप्रबोधन यात्रेनिमित्त जळगाव दौऱ्यावर आहेत. त्यांच्यासोबत शरद कोळीही होते. गुरुवारी चोपडा येथे सभेसाठी आले असताना सुषमा अंधारे पत्रकारांशी बोलत होत्या. सुषमा अंधारे म्हणाल्या, हो, अण्णा हजारेंमुळेच भाजपा सत्तेत आली. अण्णा हजारे लोकपालाची जी मांडणी करतात ती मागणीच मुळात संवैधानिक चौकटीच्या बाहेरची आहे. संसदीय लोकशाही मोडीत काढून अध्यक्षीय लोकशाही आणण्याचाच तो एक प्रयत्न होता. त्यातील त्रुटी कधीच दाखवण्याचा प्रयत्न झाला नाही. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे तिघे विभक्त असले पाहिजे ही मूळ चौकट आहे. जेव्हा या तिघांच्या वर लोकपाल बसवला जातो तेव्हा संवैधानिक चौकट मोडण्याचाच प्रयत्न होतो. अण्णा हजारे आज एवढे प्रश्न उभे राहत आहेत, त्यावर ते चकार शब्द बोलत नाहीत.

# पत्रकार आपचा मुख्यमंत्री उमेदवार

## गुजरात विधानसभा निवडणुकीत 'आप'कडून जोरदार प्रचार

आधुनिक केसरी न्यूज

**मागील काही दिवसांपासून आम आदमी पार्टीचे अनेक नेते गुजरातमध्ये तळ ठोकून बसले आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'आप'कडून जोरदार प्रचार केला जात आहे. आज अखेर आम आदमी पार्टीने गुजरामधील मुख्यमंत्री पदाचा उमेदवार घोषित केला आहे. माजी पत्रकार इसुदान गढवी हे आम आदमी पार्टीचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार असणार आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा केली.**



गुजरातचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठी आम आदमी पार्टीने एक सर्वेक्षण घेतले होते. यामध्ये जवळपास १६ लाख ४८ हजार ५०० लोकांनी सहभाग घेतला. यातील ७३ टक्के लोकांनी इसुदान गढवी हे मुख्यमंत्री असावेत, अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार आज इसुदान गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. याआधी पंजाबचा मुख्यमंत्री कोण असावा? यासाठीही 'आप'ने अशाच प्रकारचं सर्वेक्षण केले होते.

इसुदान गढवी यांनी गेल्यावर्षी जूनमध्ये पत्रकारितेला रामराम ठोकला होता. त्यानंतर त्यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश केला. गुजरात 'आप'चे प्रमुख गोपाल इटालिया हेही मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी शर्यतीत होते. मात्र, ७३ टक्के मते इसुदान गढवी यांनी मिळाली आहेत. त्यानुसार जनतेचा कौल विचारात घेऊन गढवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवारीसाठी घोषणा झाल्यानंतर गढवी यांनी ट्विटरवर प्रतिक्रिया दिली. माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीवर विश्वास ठेवून एवढी मोठी जबाबदारी दिली, त्यासाठी आम आदमी पार्टी, अरविंद केजरीवाल आणि विशेषतः गुजरातमधील जनतेचे मनःपूर्वक धन्यवाद देतो. मी सदैव लोकांचा सेवक बनून लोकहिताची कामं करत राहील.



कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक विठ्ठल - रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील गुलाबराव साळुंखे आणि कलावती साळुंखे या वारकरी जोडप्याला पूजेचा मान मिळाला. ते ५० वर्षांपासून वारी करत आहेत.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी पहिल्यांदाच या प्रकरणात मध्यस्थी केली आहे. त्यांच्या सूचनेनुसार सीमाभागातल्या प्रश्नांबाबत आज कोल्हापूरमध्ये मंथन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत तसेच सीमाभागातील दोन्ही राज्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यामुळे संपूर्ण कोल्हापूर शहराला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शहरात ठीक ठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. या बैठकीच्या माध्यमातून अनेक दशकांपासून सुरू असलेल्या बेळगाव सीमाप्रश्नावर तोडगा निघणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. दोन्ही राज्यांचे राज्यपाल महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत हे कोल्हापुरात दाखल झाले आहेत. काही क्षणात ही बैठक सुरू होईल, अशी माहिती आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सुरू आहे. याप्रकरणी नेहमीच दोघांमध्ये संघर्ष पाहायला मिळाला तर आता हा संघर्ष मिटवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी पहिल्यांदाच या प्रश्नात मध्यस्थी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार आज कोल्हापुरातील रेसिडेन्सी क्लब येथे महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यामध्ये मंथन बैठक होत आहे.

## जे जे रुग्णालयात आढळले भुयार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईतील सर जे जे रुग्णालयात ब्रिटीशकालीन भुयार आढळले आहे. हे भुयार 130 वर्ष जुने असून ब्रिटीशांनी ते बनवले अशी माहिती समोर येत आहे. रुग्णालयातील डॉ. अरुण राठोड हे राऊंडवर असताना त्यांना हे भुयार दिसले. जे जे रुग्णालयाकडून आर्किओलॉजी डिपार्टमेंटला आणि स्थानिक प्रशासनाला भुयारबाबत कळवणार जाणार आहे. हे भुयार डिलिव्हरी वॉर्ड ते चिल्ड्रन वॉर्डपर्यंत असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली आहे. जेजे रुग्णालयात जुन्या इमारतीच्या आत 200 मीटर लांबीचे भुयार सापडले आहे. जेजे रुग्णालयाच्या डीएम पेटिट इमारतीत जिथे सध्या नर्सिंग कॉलेज भरते तिथे एका निवासी डॉक्टरांना आणि सुरक्षारक्षकांना या भुयाराचा शोध लागला. डॉक्टर अरुण राठोड यांच्या निदर्शनास एक झाकण आले. कुतूहल म्हणून हे झाकण उघडल्यानंतर एक लांबलचक पोकळी त्यांना दिसली आणि त्याच्या आतमध्ये एक भुयार असल्याचे समोर आले. जे जे रुग्णालय परिसरात अशा प्रकारचे अनेक जुन्या इमारती आहेत त्यातील काही इमारतींना हेरिटेज वास्तूचा दर्जा प्राप्त आहे.


# गोव्यात समुद्र किनाऱ्यांवर दारू पिण्यास बंदी

## नियमांचे उल्लंघन केल्यास ५० हजारांपर्यंत दंड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गोवा सरकारने राज्यातील पर्यटनाशी संबंधित काही नियम कठोर केले आहेत. गोव्यातील समुद्र किनाऱ्यांवर स्वच्छता राखण्यासाठी सरकारकडून काही नियम जारी करण्यात आले आहेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांना आर्थिक दंड ठोठावला जाणार आहे. त्यांच्यावर गोवा पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार आहे. गोवा सरकारच्या नव्या नियमानुसार सार्वजनिक ठिकाणी जेवण बनवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. किनाऱ्यांवर कचरा फेकल्यास आर्थिक दंड ठोठावला जाणार आहे. या शिवाय किनाऱ्यावर गाडी चालवणे आणि दारू पिण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास पर्यटकांना पाच हजार ते ५० हजारांपर्यंतचा दंड ठोठावला जाऊ शकतो. महाराष्ट्रातील मालवण आणि कर्नाटकातील कारवारमधील वॉटर स्पोर्ट्सच्या अवैध तिकीट विक्रीवरही गोवा सरकारने बंदी घातली आहे. अनधिकृतपणे तिकिट विक्री करण्याऱ्यांवरही सरकारकडून कारवाई केली जाणार आहे. अवैध व्यवसायांमुळे पर्यटन स्थळांचे नुकसान होत असल्याचे गोवा सरकारने म्हटले आहे. अनधिकृत हातगाड्या आणि फेरीवाल्यांवरही गोवा सरकारने निर्बंध लावले आहेत.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गाथा एका शूरवीराची


आधुनिक केसरी

तिरंगा डौलाने फडकू लागला. 'भारतमाता की जय, पोर्तुगीज चले जाव' या सारख्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. हेमंत अनिमिष डोळ्यांनी तिरंग्याकडे अभिमानाने पाहत होता. काही क्षणांच्या अवधीतच पोर्तुगीज सैनिकांच्या संगिनी त्याच्यावर रोखल्या गेल्या. हेमंतला फरफटत एका दालनात नेण्यात आले. तेथे त्याला बेदम लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. हेमंत खाली कोसळला. रक्ताच्या तीन उलट्या होऊन रक्ताच्या थारोळ्यात तो खाली कोसळला. त्याची शुद्ध हरपली. गोमांतक चळवळीचे अध्यक्ष पीटर अल्वारीस त्या ठिकाणी आले. त्यांनी 'तिरंगा फडकवल्यावर तो हुतात्मा झाला आहे. हेमंत इज शॉट डेड' असे उद्गार काढले. हेमंतच्या मृत्यूची बातमी टाइम्स ऑफ इंडिया आणि अन्य वृत्तपत्रात छापून आली. वृत्तपत्रांनी हेमंतच्या मृत्यूवर जणू शिक्कामोर्तब केले होते.

ही बातमी हेमंतच्या आईवडिलांपर्यंत पोहोचली. सगळेच सुन्न झाले. हेमंतच्या आईचा मात्र या बातमीवर विश्वास नव्हता. 'हेमंत जिवंत आहे. त्याला काही होणार नाही' अशी त्या माऊलीची खात्री होती. सगळीकडे मग 'हेमंत सोमण अमर रहे' च्या घोषणा निनादू लागल्या. पोर्तुगीजांच्या अत्याचाराचा निषेध करणाऱ्या आणि हेमंतला श्रद्धांजली वाहणाऱ्या सभा गावोगावी झाल्या. पुण्यात शनिवारवाड्यावर सगळ्यात मोठी शोकसभा झाली. पुण्यातील मान्यवर मंडळी या सभेला उपस्थित होती. असे सगळे सुरु असतानाच या परिस्थितीला एक वेगळी आणि नाट्यपूर्ण कलाटणी मिळाली. २१ ऑगस्ट १९५४ ला हेमंतचे वडील बाबुराव यांना एक तार आली. त्यात हेमंत जिवंत आणि सुखरूप असल्याची बातमी होती. दुःखाच्या प्रचंड धक्क्यातून कुटुंबीय बाहेर पडत नाहीत तोच हा सुखद धक्का त्यांना मिळाला होता. **(क्रमशः)**



क्रांतिसूर्य हेमंत लक्ष्मण सोमण



# आनंदी पहाट

## स्वप्नावस्थेला सत्यात उतरविणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपले अर्ध्यापेक्षा अधिक आयुष्य हे स्वप्न बघण्यातच जात असते. जगात एकही व्यक्ती अशी सापडणार नाही कि जी स्वप्न बघत नाही. अर्थात दिवा स्वप्न बघण्याचा प्रत्येकाला छंद असतो. झोपेत बघितलेली स्वप्न आपल्याला जागेपणी आठवतातच असे नाही, तसेच जागेपणी बघितलेली स्वप्न देखील झोपेत दिसत आणि आठवत नाहीत. झोपेतील स्वप्न साकार होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण जाग आल्यावर ती आठवतच नाहीत. पण जागेपणी बघितलेले प्रत्येक स्वप्न साकारणे आणि त्यांना सत्यात उतरविणे शक्य होऊ शकते. स्वप्नावस्था ही आपल्या अंतर्मनाशी निगडीत असते. ज्या गोष्टी अंतर्मानला स्पर्श करतात, त्या नेमकेपणाची प्रचीती देत असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या गोष्टी बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचे असते. आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणाने मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचे देखील जाणवते. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचे निराकरण होत जाते. काहीवेळा उद्‌भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणाते आपल्या मनांतील शंका व्यक्त करणे उपयुक्त ठरते. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरे सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात.



आधुनिक केसरी

## म्हणूनी वारीचा | पाईक मी ||

यातनाचे भय |आम्हा काय वाटे ||
यत्नाचे दीवटे | आम्हा हाती ||१||

कठोर साधना | आम्हा ठायी वसे ||
तया कैसे पीसे | लागे सांगा ? ||२||

नको मना अती | करू रे विचार ||
अंगी सदाचार | जागा ठेवी ||३||

हरिनामा संगे | झाली सोयरिक ||
म्हणूनी सोशिक | देह झाला ||४||

सारा भार साहे | विठ्ठल आमुचा ||
म्हणूनी वारीचा | पाईक मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## राहीन सर्वस्व अर्पूनी

पहा आमुचा रूबाब। त्यासी नसे रे जबाब।
विश्वाचिया मालकीण। मैत्रीण ही वैतरणी।।
शक्ती पायी आम्ही आलो।
शक्तीची कृपा पावलो।
ऐसिया प्रतिज्ञा केली। शक्ती पूजीन जीवनी।।
मायपिताबहिण। बंधु चुलता चुलती।
आमुची तो सर्व नाती। पाहे ठायी भवानी।।
माय आम्हां पाठीराखी। उरले रे काय बाकी।
हास म्हणे मी पायी। राहीन सर्वस्व अर्पूनी।।

## जनावाहन

यारे यारे सारे जन। सांगा अंबेसी गा-हाणं।
अंबा राहे भक्तासाठी। उभी कैवल्यदा पाठी।
प्रमेय प्रमाण आम्हा। सर्व काही माय अंबा।
चंद्रहासे जे कळाले। भक्ती राहे गरीयसी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# भगवंताच्या प्राप्तीची साधने



आधुनिक केसरी

भगवंत आणि आपण ह्यांच्यामध्ये अभिमानाचा पडदा आहे; हा दूर झाला म्हणजे आपल्याला भगवत्प्राप्ती झाली. हा दूर व्हायला अनेक मार्ग आहेत. कर्ममार्ग, हठयोग,राजयोग, वगैरे मार्गांनी हा तितका लवकर दूर होत नाही; उलट क्वचित् प्रसंगी वाढतोही. भक्तिमार्ग सोपा आहे. भक्ति म्हणजे भगवंताला अभिमानरहित अनन्य शरण जाणे, भगवंताचे होऊन राहणे, भगवंताशिवाय दुसरे काहीच न दिसणे, सर्वत्र भगवत् प्रचीती येणे. अशी भक्ति प्राप्त होण्याचा मार्ग म्हटला म्हणजे सर्व कर्तृत्व भगवंताकडे देणे, सर्व त्याच्या इच्छेने चालले आहे असे मानणे, आणि आपली प्रत्येक क्रिया त्याला समर्पण करणे. असे केल्याने आपला अभिमान लवकर नाहीसा होतो. हे साधत नसेल तर गुरु आज्ञेत राहणे, म्हणजेच आपला मान अभिमान, शहाणपण, हे सर्व गुंडाळून ठेवून, गुरु सांगतील तसे, सबब न सांगता वागणे. हेही साधत नसेल तर संतांजवळ नुसते पडून राहणे. त्यांच्या सांगण्याने, सहवासाने, अभिमान हळूहळू कमी होतो.

भक्ति दोन प्रकारांनी उत्पन्न करता येते. पहिला प्रकार म्हणजे सर्व सोडून, लंगोटी लावून, 'भगवंता, तू मला भेटशील तेव्हाच मी उठेन,' अशा निग्रहाने बसणे. हा मार्ग कठीण आहे. प्रापंचिकाला हा साधणार नाही. दुसरा प्रकार म्हणजे सहवासाने भक्ति उत्पन्न करणे. भगवंताचे गुणवर्णन वाचणे, त्याचेच गुण श्रवण करणे, त्याच्या दर्शनास जाणे, प्रत्येक कृत्य भगवंताकरिता करणे, प्रत्येक कृत्यात त्याचे स्मरण ठेवणे; असा त्याचा अखंड सहवास ठेवावा, म्हणजे भगवंताच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होते. विषयाकरिता केलेली भगवद्‌भक्ति ही खरी भक्ति होऊ शकत नाही. भगवत्‌सेवा निष्काम पाहिजे; कारण भक्ति म्हणजे संलग्न होणे. मी विषयाशी संलग्न असतो तेव्हा ती विषयाची भक्ति होते, भगवंताची नाही. तेव्हा, आपण करतो ही भगवंताची सेवा नसून विषयाची सेवा होते हे ठरल्यासारखे झाले; म्हणजे मी विषयाचाच गुलाम झालो. विषयांचा गुलाम होऊन मी विषय कसचे भोगणार ? मालक होऊन विषय भोगावेत. संत, भगवंत, हे निरतिशय सुख देणारे आहेत. त्यांच्याजवळ विषय मागणे म्हणजे रामाजवळ भिक्षेचे फडके मागण्याइतकेच वेडेपणाचे नव्हे का ? आपण सेवेचे फळ मागून भगवंताला मात्र दूर करतो. भगवंताची प्राप्ती हेच आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे. भगवंतामध्ये जे मिसळतात ते परत येत नाहीत, हे लक्षात ठेवावे.


बोधवचन : भगवंताच्या प्राप्तीच्या आड येणारे नाहीसे व्हावे म्हणून तळमळणारा जो असतो, त्याचे साधन बरोबर चाललेले असते.

**– श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# सापशिडी आणि संत ज्ञानेश्वर

आधुनिक केसरी

संत ज्ञानेश्वरांचे विचार आणि तत्त्वज्ञान जसे कालातीत आहेत, तसे त्यांनी लावलेला एक शोधही अजरामर आहे, तो म्हणजे सापशिडीचा खेळ! या खेळाची निर्मिती संत ज्ञानेश्वरमाऊली यांनी केली आहे, असे सांगितल्यास विश्वास बसणार नाही; पण हे सत्य आहे. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या या खेळाविषयी जाणून घेऊया. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सापशिडीचे गुपित 'डेन्मार्क'चे जेकॉब आणि पुणे येथील ज्येष्ठ संशोधक वा.ल. मंजुळ यांनी उलगडले..संत ज्ञानेश्वर महाराजांनीच सापशिडीचा शोध लावला, याचे स्पष्ट पुरावे मिळत नव्हते;पण 'डेन्मार्क' देशातील जेकॉब यांच्या साहाय्याने हे गुपित उलगडले गेले.'इंडियन कल्चरल ट्रॅडिशन' या संकल्पनेच्या अंतर्गत डेन्मार्क येथील 'डॅनिश रॉयल सेंटर'चे संचालक डॉ. एरिक सँड यांचे विद्यार्थी जेकॉब यांनी 'मध्ययुगीन काळात भारतात खेळले जाणारे खेळ', हा विषय संशोधनासाठी निवडला. या संशोधनाच्या वेळी त्यांच्या असे लक्षात आले की, १३ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सापशिडीचा शोध लावलेला असू शकतो. जेकॉब यांनी अनेक जुने सापशिडीचे पट त्यांनी मिळवले; परंतु योग्य संदर्भ मिळत नव्हते. संत



ज्ञानेश्वरांच्या चरित्रातही याविषयी कुठे उल्लेख नव्हता. अखेर संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि संशोधक वा.ल. मंजुळ यांच्याकडे त्यांनी विचारणा केली. मंजुळ यांनी पुणे येथील डेक्कन महाविद्यालयामध्ये तशा प्रकारचा संदर्भ असल्याचे सांगितले आणि 'मोक्षपट' उलगडा गेला.मनुष्याने आयुष्य कसे जगावे, याचे तत्त्वज्ञान सांगणारा सापशिडी खेळ ! 'मोक्षपट' हा पहिला सापशिडीपट होता, असे सांगितले जाते. संत ज्ञानेश्वर आणि संत निवृत्तीनाथ भिक्षा मागण्यासाठी गावात जात असत. घरात एकट्या असलेल्या संत सोपानदेव आणि संत मुक्ताई यांचे मन रमावे;म्हणून संत ज्ञानेश्वर आणि संत निवृत्तीनाथ यांनी या खेळाचा शोध लावला, असे सांगितले जाते. लहान मुलांना खेळाच्या माध्यमातून चांगले संस्कार मिळावेत हा यामागील उद्देश होता.मोक्षपटाचे दोन्हीपट २० X २० इंच आकाराचे असून त्यात ५० चौकोनी घरे आहेत. पहिले घर जन्माचे, तर शेवटचे घर मोक्षाचे आहे.माणसाच्या जन्मापासून त्याला मोक्ष मिळेपर्यंतचा प्रवास या पटामधून मांडण्यात आला आहे. 'मोक्षपट' खेळण्यासाठी सापशिडीप्रमाणेच ६ कवड्यांचा वापर करावा लागतो. ६ कवड्या पूर्ण पालथ्या पडल्या, तर दान मिळते.सापशिडीच्या खेळाप्रमाणेच यातही साप आहेत. त्यांना काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंची नावे देण्यात आली आहेत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगती करण्यासाठी शिडी आहे. तिला सत्संग, दया, सद्‌बुद्धी अशी नावे देण्यात आली आहेत. माणसाने आयुष्य कशा प्रकारे जगावे, याचे तत्त्वज्ञान या खेळातून सांगण्यात आले आहे. जेकॉब यांना डेक्कन महाविद्यालयामध्ये रा.चिं. ढेरे यांच्या हस्तलिखित संग्रहातून दोन 'मोक्षपट' मिळाले.मोक्षपटाच्या हस्तलिखितावर लिहिलेल्या ओव्यांमध्ये आयुष्य कसे जगावे ? कोणती कवडी पडली की, काय करावे ? याचे मार्गदर्शन अगदी सहजपणे सांगण्यात आले आहे.. सापशिडी जरी अधुनिक असली, तरी गर्भितार्थ तोच राहील, यात काही शंका नाही. इंग्रजांनी सापशिडी हा खेळ नेऊन त्याचे 'स्नेक अँड लॅडर' असे नामकरण करणे. 'व्हिज्युअल फॅक्टफाईंडर-हिस्ट्री टाइमलाईन' या पुस्तकात वर्ष ११९९ ते १२०९ या कालखंडातील जगातील महत्त्वाच्या घडामोडींविषयी माहिती मिळते 'उल्लेखनीय गोष्ट' या शीर्षकाखाली '१३ व्या शतकातील भारतीय कवी संत ज्ञानदेव यांनी कवड्या आणि फासे यांचा उपयोग करून एक खेळ सिद्ध केला.यात खेळाडू शिडीचा उपयोग करून वर चढणार आणि सापाच्या तोंडी आल्यावर खाली उतरणार. शिडीच्या साहाय्याने वर चढणे हे चांगले समजले जाई, तर सर्पदंश ही अनिष्ट गोष्ट समजली जात असे. हा खेळ 'सापशिडी' या नावाने अद्यापही लोकप्रिय आहे', असा उल्लेख सापडतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाऊली, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव आणि संत मुक्ताई ही सर्व भावंडे हा खेळ खेळत असत. पुढे भारतभर या खेळाचा प्रसार झाला. इंग्रज भारतात आल्यावर त्यांना हा खेळ प्रचंड आवडला.

# आत्मभान विसरून उन्माद पसरवणाऱ्या प्रवृत्ती ठेचण्याची गरज

## भिंडेंच्या वक्तव्यावर विविध क्षेत्रातील महिलांच्या आधुनिक केसरीस संतप्त प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांनी मुंबईत एका महिला पत्रकारास "तू आधी कुंकू लाव, मगच बोलतो... असे धक्कादायक वक्तव्य करून पुरोगामी महाराष्ट्रात नवा वाद निर्माण केला आहे. स्त्रियांनी कसे राहावे, कोणते पोशाख घालावेत,कोणती आभूषणे घालावीत याचा तिलाच अधिकार असायला पाहिजे. परंतु समाजव्यवस्थेत अजूनही विचित्र प्रवृत्तीचे जळमटं आतून पोखरतच आहेत. हे कितीतरी दुर्दैवच म्हणावे लागेल. अशा घाणीचे करायचे काय ? अशा प्रवृत्ती वेळीच ठेचून काढण्याची गरज आता क्रमप्राप्त ठरत आहे. हा प्रश्न समाजमनाला प्रचंड सतावतो आहे. यानिमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तुत्वान महिलांनी आत्मभान विसरून विचित्र उन्माद पसरवणाऱ्या प्रवृत्ती समाजाने ठेचण्याची गरज आधुनिक केसरीस व्यक्त केली.





### भिंडेंचे वक्तव्य म्हणजे संस्कृती रक्षणाचे निर्लज्ज प्रदर्शन



पुरोगामी महाराष्ट्रात एका महिला पत्रकाराशी भिडे यांनी जे मनुस्मृतीच्या विचाराने असभ्य वर्तन केले ते निंदनीय आहे. भिडेचे विचार म्हणजे शेणातल्या किड्यासारखे नपुंसक झालेले दिसतात. पुरोगामी महाराष्ट्रात महिला आता जागृत आहेत. क्रांतीज्योती सावित्रीमाईच्या,जिजाऊंच्या लेकी आहेत. भिडेंनी आता मर्यादा ओलांडू नयेत. बुरसटलेले विचार सोडून महाराष्ट्राच्या चळवळीचा आणि कर्तृत्वान महिलांचा इतिहास जाणून घ्यावा. सावित्रीमाईंच्या अंगावर चिखलफेक करणाऱ्या सनातनी प्रवृत्ती नपुंसक होत्या. आणि आता भिंडेचे हे वक्तव्य म्हणजे वर्तमानाचे फायदे लाटण्यासाठी संस्कृती रक्षणाचे केलेले एक निर्लज्ज प्रदर्शन म्हणावे लागेल. आता हे समाजाकडून कदापि सहन करुन घेतले जाणार नाही.


सुरेखा काळुंके, समुपदेशक तथा सामाजिक कार्यकर्ता, बीड

### सनातनी प्रवृत्तींचे दर्शन झाले...



सवंग लोकप्रियतेसाठी उठसूट बेताल वक्तव्य करून आपला ऊर बडवून घेणा-या अशा पिळदार मिश्यांच्या प्रवृत्ती समाजाने आता छाटण्याची वेळ आली आहे. आधुनिक जगात वावरणा-या स्त्रीने पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत ती सन्मानाने जगत असल्याने भिंडेच्या पोटात उठलेला हा सनातनी गोळाच म्हणावा लागेल. स्त्रीने कसे राहावे, काय घालावे, कुंकू की टिकली लावावी हे सांगणारे भिडे कोण? संस्कृती रक्षणाचा टेंबा मिरवणा-यांनी आधी आपल्या बुडाखाली काय जळत आहे हे पहावे. म्हणूनच अशा सनातनी भिडे प्रवृत्ती वेळीच ओळखून ठेचून काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

- प्रमिला लोदगेकर, प्रसिद्ध लावणी कलावंत, लातूर.



### भिंडेना भीडभाड न ठेवता आवरा हो



एखाद्या स्त्रीने कुंकू लावावे की, लावू नये! हा तिचा वैयक्तिक प्रश्न आहे. चारचौघात एखाद्या महिला पत्रकाराला असं बोलणं योग्य नव्हे. तिने कुंकू लावलं नाही ,म्हणून तिने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देणार नाही ! हे कुठल्याही स्त्रीला अपमानास्पद वाटू शकतं. फक्त कुंकू लावल्यामुळे स्त्रीची ओळख असते का? तिचा स्वतःचे पण काहीतरी अस्तित्व असतं. बुरसटलेल्या विचारांच्या अशा लोकांना आधुनिक समकालीन स्त्रियांनी घेतलेली उत्तुंग झेप डोळ्यात सतत खुपते. म्हणूनच अशा प्रवृत्ती सनातनी मिशींआडून अधूनमधून समाजात बाण मारतात आणि त्यात त्यांना धन्यता वाटते. म्हणूनच डोके ठिकाणावर नसणा-या अशा भिंडेना भीडभाड न ठेवता आवरण्याची गरज आहे.

-सौ सीमा देशमुख, लेखिका, अमरावती

### कुंकू टिकली न बघता तिची क्षमता बघा...



शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांनी महिला पत्रकारास "तू आधी कुंकू लाव, मगच बोलतो..." असे धक्कादायक वक्तव्य करून विचित्र उन्मादाचा एक पुरावाच दिला आहे. यानिमित्ताने आपण किती अधोगतीला व अधंपतनाला गेलो आहोत हे सिद्ध झाले आहे. लोकशाही ही नावापुरतीच राहिली असून स्त्री स्वातंत्र्य खरंच आपल्या समाजात आहे का? हा पडखर प्रश्न भिडे गुरुजींना विचारावसा वाटतो. स्त्रियांनी कसे राहावे, कोणते पोशाख घालावेत,कोणती आभूषणे घालावीत याचा तिलाच अधिकार असायला पाहिजे. आणि तो असायलाच पाहिजे! परंतु आपलं हे दुर्दैवच म्हणावे लागेल की आज पण समाज व्यवस्था हीं काही संकुचित विचाराच्या प्रवृत्तीमुळे बारगळत चालली आहे, बुरसट विचारांची होत आहे . अशा प्रवृत्ती वेळीच आवरण्याची गरज असून स्त्रियांची क्षमता, त्यांची ताकद बघा, ना की त्यांचे कुंकू, केस आणि कपडे त्यावरून तुम्ही त्यांना आजमाऊ नका आणि अनुमान काढणे बंद करा.

डॉ. दीपाली उमाळे, पाठयनिर्देशिका, मुंबई

### भिडेंनी थंड डोक्याने विचार करावा...



संभाजी भिडेंनी अगोदर महिलांचा आदर करायला शिकायला हवे. महीलांनी कुंकु लावायचं, मंगळसुत्र घालायचे, त्यांनी कसे राहायचे हे शिकवण्याऐवजी आपली सभ्यता आणि विचारांची चौकट काय आहे हे तपासले पाहिजे. संस्कृती ही फक्त महिलांनी जपायची, पुरुष प्रधान देश म्हणून पुरुषांनी फक्त महिलांवर अत्याचार करायचा आणि महिलांना समान अधिकार असल्याची दिमडी पिटतं सुटायची ही कसली संस्कृती? संभाजी भिडे यांनी एकदा महिलांचे अधिकार काय आहेत याचे चिंतन करावे. भिडेंनी स्वतः एका महीलेच्या पोटीच जन्म घेतला आहे तिच्या वेदना आणि संवेदना जाणल्या पाहिजेत. उठसूट बेताल विधान करून लोकप्रियता मिळवण्याचा धंदा बंद करावा. आणि भिडेनी थंड डोक्याने विचार करायला शिकलं पाहिजे.

- शशिकला भडके, परिसेविका, नागपूर.

### भेदभावाच्या गर्तेतून बाहेर पडावे...



संभाजी भिडे या माथेफिरूने केलेले विधान निषेध करणारेच आहे. भिडेंना मी यानिमित्ताने सांगू इच्छिते हे युग एक्केवीसावे असून ते संपूर्ण स्त्रीयांच्या कर्तृत्वाने उजळून निघालेले आहे. त्यात प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांची कामगिरी देशविकासात मदत करत आहे. इथे प्रत्येक स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसते. त्यात तिने काय करायचे ,काय नाही हा संपूर्ण विचार अचारांचा अधिकार तिला संविधानाने दिला आहे.स्त्री मानव जातीच्या विकासातील सर्वात मोठा घटक आहे . त्यामुळे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अथक प्रयत्नाने व अनेक समाज सुधारकांच्या कार्याने आता ती स्वतंत्र पणे जगते आहे त्यात असल्या हिन वृत्तीच्या माणसांनी आपली मनोविकृती बदलावी आणि जातीपातीच्या आणि स्त्री पुरुष भेदभावाच्या गर्तेतून भिडेंनी बाहेर पडून माणसांसारखे जीवन व्यतीत करावे. आणि हे करताना एकदा भारतीय संविधान जरुर वाचावे. -शितल प्रवीण काळे, लेखिका, माजलगाव जि. बीड

# राष्ट्रवादीवर जेव्हा टीका होते याचा अर्थ पक्ष बलशाली : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** आपल्या राष्ट्रवादी पक्षावर जेव्हा टिका होते याचा अर्थ आपला पक्ष बलशाली आहे. महाराष्ट्रात हाच पक्ष आपली सत्ता धोक्यात आणू शकतो ही भीती असल्याने सत्ताधाऱ्यांकडून राष्ट्रवादीवर टिका होत आहे असा जबरदस्त आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केला.
राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबीराला आजपासून शिर्डीत सुरुवात झाली. या शिबीराच्या सुरुवातीला झेंडावंदन पार पडले. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रास्ताविक केले. या प्रास्ताविकात जयंत पाटील यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.
राष्ट्रवादी पक्षाला २३ वर्ष झाली आहेत. आदरणीय शरद पवारसाहेब या शिबिराला कालच येणार होते. मात्र ते उद्या येऊन मार्गदर्शन करतील असेही जयंत पाटील यांनी सांगितले. राज्यात सत्ता नसताना आपण केंद्रस्थानी होतो. हल्लाबोल आंदोलन केले. पदयात्रा काढली. त्यानंतर विदर्भात बोंडअळी नुकसानग्रस्तांना मदत सरकारला द्यावी लागली. आज शेतकरी अडचणीत, अस्वस्थ शेतकरी आहे सरकार मात्र याकडे लक्ष देत नाही. शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी सरकारला विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारला निवेदन दिले मात्र सरकारने अद्याप ओला दुष्काळ जाहीर केला नाही याबद्दल तीव्र नाराजी जयंत पाटील यांनी व्यक्त केली.
आपल्या मंत्र्यांनी चांगले काम केले हे जनतेला सांगण्याची गरज आहे. आपल्या पक्षाच्या माध्यमातून झालेली कामे पोचवा ती लोकांपर्यंत जायला हवीत असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले.
शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड केले त्या बंडखोरीशी काही संबंध नाही म्हणणारे भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार बच्चू कडू हे एका फोनवर गुवाहाटीला गेले हे जाहीर सांगतात यावरून या बंडामागे कोण होतं हे लक्षात येते असा सवालही जयंत पाटील यांनी उपस्थित केला.
या शिबिराला ज्येष्ठ नेते खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विरोधी पक्षनेते अजितदादा पवार, माजी मंत्री छगन भुजबळ, खासदार सुनिल तटकरे, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे, माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार फौजिया खान, खासदार वंदना चव्हाण, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, माजी मंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री आदिती तटकरे, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, कोषाध्यक्ष हेमंत टकले, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, माजी मंत्री एकनाथ खडसे, आमदार शशिकांत शिंदे, आमदार आशुतोष काळे, माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी, पक्षाचे सर्व आमदार, माजी आमदार, उपाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष, प्रवक्ते, सरचिटणीस, फ्रंटल सेलचे राज्यप्रमुख, संघटक सचिव, महिला प्रदेशाध्यक्षा, युवक प्रदेशाध्यक्ष, युवती प्रदेशाध्यक्षा, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष आदींसह सर्व निमंत्रित उपस्थित होते.



# कर्मचारी कपातीचा इशारा अंगाशी

आधुनिक केसरी

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या एलॉन मस्क हे ट्वीटर कंपनीचे मालक झाल्यापासून घडामोडींना वेग आला आहे. मस्क यांनी कंपनीमधून ५० टक्के कर्मचारी कपात करणार असल्याचे म्हटले आहे. मात्र मस्क यांनी यासंदर्भातील घोषणा केल्यानंतर काही वेळातच जगभरातील अनेक भागांमध्ये ट्वीटरची सेवा विस्कळीत झाल्याचे दिसून येत आहे. ट्वीटर मोबाईलवर व्यवस्थित काम करत असलं तरी ट्वीटर वेबवर बऱ्याच तांत्रिक अडचणी येत आहेत. अनेकांना ट्वीटरवर पोस्ट करण्यात, रिफ्रेशन करण्यात अडचणी येत आहे. "Something went wrong, but don't fret — let's give it another shot," असा मेसेज अनेकांनी दिसत आहे. एका तासाहून अधिक काळ अनेकांना या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र अनेकांनी या तांत्रिक अडचणींचा संदर्भ आता कर्मचारी कपातीच्या इशाऱ्याशी जोडण्यास सुरुवात केली आहे. जगभरातील वेगवेगळ्या वेबसाइट्सवरील तांत्रिक अडचणींवर लक्ष ठेऊन असलेल्या 'डाऊन डिडेक्टर'वर अनेकांनी ट्वीटर रिफ्रेश होत नसल्याचे म्हटले आहे. अनेकांनी ट्वीटर वेबवरुन लॉगइन करताना अडचणींचा सामाना करावा लागत आहे. वेबसाईटवर अनेकांना लॉगइन एरर दाखवत आहेत. डाऊन डिडेक्टर'च्या आकडेवारीनुसार ९४ टक्के लोकांनी ट्वीटर वेबवर लॉगइनला अडचणी येत असल्याचे म्हटले आहे. तर सहा टक्के लोकांना मोबाईलवरुन ट्वीटर पाहण्यात अडचणी येत आहेत. मात्र भारतामध्ये अनेक ठिकाणी आयओएस आणि अॅण्ड्रॉइडवर ट्वीटर व्यवस्थित काम करत असलं तरी ट्वीटर वेबवर अनेकांना अडचणींचा सामना करावा लागतोय. या पेजवर केवळ एररचा मेसेज दाखवला जात आहे. एलॉन मस्क यांनी काही तासांपूर्वीच कंपनीमधील कर्मचाऱ्यांना नोकरकपातीचे संकेत दिले होते. कंपनीतील जवळजवळ ५० टक्के कर्मचाऱ्यांना कामावरुन काढण्यात आलं आहे की नाही, याबाबत ट्वीटरकडून ईमेलद्वारे आज कर्मचाऱ्यांना कळवण्यात येणार आहे, असं वृत्त 'सीएनएन'ने दिले आहे. ट्वीटरला भक्कम स्थितीत आणण्यासाठी आम्ही नोकरकपातीच्या कठीण निर्णय आज आम्ही घेत आहोत, असा ईमेल कंपनीने कर्मचाऱ्यांना पाठवल्याचं वृत्त 'रॉयटर्स'ने दिले आहे. या प्रक्रियेदरम्यान कार्यालयं तात्पुरती बंद राहणार आहेत. शिवाय कर्मचाऱ्यांचे बॅजही काही काळासाठी निषक्रिय करण्यात येणार आहे, असाही उल्लेख या ईमेलमध्ये आहे. कर्मचारी, ट्वीटरच्या यंत्रणांसह ग्राहकांच्या मजकुराच्या सुरक्षेसाठी हे करण्यात येत असल्याचं ट्वीटरकडून सांगण्यात आले आहे.

# मराठी रंगभूमी दिन!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मराठी रंगभूमीचा परिप्रेक्ष- पार्श्वपृष्ठ हा कीर्तन, भारुड, दंडार, दशावतार, पोवाडा, लळीत, नक्कल, भागवतमेळे, नटवे, बहुरूपी लोकनाट्य, तमाशा, सोंग, गोंधळ आदी लोकपरंपरा स्रोतातून झालेला आहे. लोकरंगभूमी हीच खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीची जननी आहे. क्रमाने विकसित झालेल्या रंगभूमीच्या प्रत्येक विकास टप्प्यामागे लोकरंगभूमीचे स्थान महत्त्वाचे ठरले आहे. या पार्श्वभूमीवर नाट्य वाङमयाचा विचार करत असताना महाराष्ट्राला फार आदिम अशी लोककलावंतांची परंपरा आहे. त्यातूनच लोकरंगभूमी विकसित झाली.**

दरवर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्र राज्य रंगभूमी दिवस किंवा मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. विष्णुदास भावे यांनी सन १८४३ साली सीता स्वयंवर हे पहिले नाटक रंगभूमीवर सादर करून मराठी नाट्यसृष्टीचा पाया घातला. सन १९४३ साली या घटनेचे स्मरण म्हणून राज्यातील या क्षेत्रातील सर्व नामवंत एकत्र आले आणि सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने ५ नोव्हेंबर रोजी नाट्यसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापण्यात आली. चिंतामणराव पटवर्धन यांनी दिलेल्या जागेवर विष्णुदास भावे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या नाट्यमंदिराची कोनशिला बसविण्यात आली. या महत्त्वाच्या क्षणी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस जाहीर केला.

मराठी रंगभूमीदिनी सांगलीची अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती १९६० सालापासून विष्णुदास भावे यांच्या स्मृत्यर्थ मराठी रंगभूमीवर दीर्घकाळ सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला विष्णुदास भावे गौरव पदक देऊन त्यांचा सन्मान करते. गौरव पदक, ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असते. आत्तापर्यंत हा पुरस्कार अमोल पालेकर, केशवराव दाते, ग.दि. माडगूळकर, छोटा गंधर्व, डॉ.जब्बार पटेल, जयंत सावरकर, ज्योत्स्ना भोळे, दाजी भाटवडेकर, दिलीप प्रभावळकर, दुर्गा खोटे, नानासाहेब फाटक, प्रभाकर पणशीकर, पु.श्री.काळे, फैयाज, बापूराव माने, बालगंधर्व, भालचंद्र पेंढारकर, महेश एलकुंचवार, माधव मनोहर, मामा पेंडसे, मास्टर कृष्णराव, रत्नाकर मतकरी, रामदास कामत, वसंत कानेटकर, विश्राम बेडेकर, शरद तळवलकर, शं.ना.नवरे, हिराबाई बडोदेकर, मोहन जोशी, मोहन आगाशे इत्यादींना मिळाला आहे.

मराठीचा गौरव करणारा रंगभूमी दिन दरवर्षी ५ नोव्हेंबरला साजरा केला जातो. त्यानिमित्ताने सांगली आणि महाराष्ट्रातही अन्य ठिकाणी हा दिवस साजरा केला जातो. आज मराठी रंगभूमी १७९ वर्षांची म्हणजे पावणेदोनशे वर्षांची झालेली आहे. मात्र, मराठी नाट्य परिषद अथवा मराठी रंगभूमीसाठी कार्यरत असणारे लोक यांच्यात व्यावसायिकता इतकी वाढली आहे, की ग्रामीण भागापासून रुजलेली ही रंगभूमीची सेवा सद्या फक्त मुंबई उपनगर आणि पुण्यापुरती मर्यादित राहिली. खरे तर मराठी रंगभूमीचा परिप्रेक्ष- पार्श्वपृष्ठ हा कीर्तन, भारुड, दंडार, दशावतार, पोवाडा, लळीत, नक्कल, भागवतमेळे, नटवे, बहुरूपी लोकनाट्य, तमाशा, सोंग, गोंधळ आदी लोकपरंपरा स्रोतातून झालेला आहे. लोकरंगभूमी हीच खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीची जननी आहे. क्रमाने विकसित झालेल्या रंगभूमीच्या प्रत्येक विकास टप्प्यामागे लोकरंगभूमीचे स्थान महत्त्वाचे ठरले आहे. या पार्श्वभूमीवर नाट्य वाङमयाचा विचार करत असताना महाराष्ट्राला फार आदिम अशी लोककलावंतांची परंपरा आहे. त्यातूनच लोकरंगभूमी विकसित झाली.

## विष्णुदास भावे स्मृत्यर्थ मराठी रंगभूमी दिन सप्ताह विशेष



रंगभूमीच्या नावाखाली नाटके चालत आहेत. हे कुठेतरी थांबणे आवश्यक आहे. याच दिवसाच्या आसपास साधारण दिवाळीनंतर राज्यनाट्य स्पर्धा सुरू होतात. या राज्यनाट्य स्पर्धांचीही अवस्था सध्या फारच वाईट आहे. ही राज्यनाट्य स्पर्धेची अधोगती गेल्या पंचवीस वर्षात खूपच होताना दिसत आहे. यापूर्वी ही स्पर्धा नागरी आणि अनागरी अशा दोन गटांत व्हायची. त्यानंतर नागरी-अनागरी असा भेदभाव न करता एकच स्पर्धा ६ विविध विभागांतून होऊ लागल्या. आता त्या विभागातूनही पुरेशा प्रवेशिका येत नसल्यामुळे अनेक केंद्र बंद पडली. ही अधोगती मराठी रंगभूमीला अत्यंत मारक आहे. याचे कारण या स्पर्धांचे आयोजन प्रत्येक जिल्ह्याच्या समाज कल्याण विभागामार्फत केले जाते. समाज कल्याणचे उपक्रम हे फक्त पाट्या टाकण्याचे उपक्रम असतात. त्या अधिकाऱ्यांना नाटकाबाबत काही माहिती असते, ना कोणतीही पुरेशी माहिती नसते. त्यामुळे या स्पर्धासाठी परीक्षक म्हणून कोणालाही धरून बांधून आणले जाते. ज्यांचा नाटकांशी काही संबंध नाही, असेही लोक परीक्षक म्हणून बसवले जातात. परीक्षक हा सक्षम असला पाहिजे. तो दिग्दर्शक, रंगकर्मी, अभिनेता असला पाहिजे. त्याला लेखनाची माहिती असली पाहिजे. किमान नाटक पाहिलेली व्यक्ती तरी आणली पाहिजे. तसे न होता कोणीतरी बळेच आणून त्याला परीक्षक बनवून मानधन दिले जाते. अनेक केंद्रांवर १२ नाटके असतील, तर त्यांसाठी तीन परीक्षक असले पाहिजेत; परंतु प्रत्येक नाटकाला वेगळा परीक्षक देण्याचा प्रकार झालेला आहे. सगळी नाटके न बघता परीक्षण करणारेही परीक्षक असतात. फक्त मानधन घेऊन डोळे मिटून बसणारे आणि आधीच निकाल तयार करणारे परीक्षक या समाजकल्याणने दिले. त्याचा परिणाम रंगभूमीची दुरवस्था झाली. शासनाचा चांगला उद्देश प्रशासन आणि चुकीच्या लोकांच्या हाती संयोजन गेल्यामुळे वाट लागली. या स्पर्धा खरे तर नाट्य परिषदेकडून घेण्याची गरज आहे. पण, नाट्य परिषदेचे सदस्य इतके बिझी आणि पैशाच्या मागे लागले आहेत, की त्यांना याकडे लक्ष देण्याची इच्छा नाही. रंगभूमीला सिनेमाची पायरी केली जाते आहे. मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये जाण्यासाठी पायरी पाहिजे म्हणून नाटक करायचे, हा दृष्टिकोन बळावला जात आहे.

त्यामुळे नंतर मालिकांमधून वेळ मिळाला, चित्रिकरणातून वेळ मिळाला, तरच नाटक करायचे. फक्त शनिवार, रविवार आणि मुंबई आणि उपनगरापर्यंतच नाटकाचे प्रयोग करायचे हा पायंडा पडला. कल्याण आणि पनवेलच्या पलीकडे महाराष्ट्र आहे याची जाणीव मराठी व्यावसायिक रंगकर्मींना राहिलेली नाही. त्यामुळे पूर्वी जसे नाटकांचे दौरे असायचे, तसे दौरे आता बंद झाले आहेत. सातारा, सांगली, कोल्हापूर, मराठवाडा, विदर्भातले दौरे बंद झाले. सातारा सांगली ही तर नाट्यपंढरी; परंतु तिथेही जाण्यात आता कलाकारांना स्वारस्य राहिलेले नाही. मराठी रंगभूमीच्या १७९व्या वर्षात ही दयनीय अवस्था आज दिसून येते आहे. त्यामुळे नाट्य परिषदेचे अध्यक्ष, सदस्य, विविध पदाधिकारी यांनी याबाबत काही निर्णय घेतले पाहिजेत. मराठी नाटक ग्रामीण भागातून जिवंत राहिले आहे. मराठी जत्रा, साखर कारखाने यांनी रंगभूमीच्या पडत्या काळात आणि विविध वाहिन्या नव्हत्या तेव्हा या कलाकारांना जगवले आहे. असे असताना त्यांच्याशीच होणारी प्रतारणा ही योग्य नाही. रंगभूमी दिनाच्या निमित्ताने नाटय परिषद आणि सरकारने काही निर्णय घेणे अपेक्षित आहे. राज्य नाटय स्पर्धांचे योग्य नियोजन व्हावे आणि मराठी नाटकांचे सर्वत्र दौरे झाले पाहिजेत. मराठी संस्कृती टिकवण्यासाठी त्याची अत्यंत गरज आहे.

!! मराठी रंगभूमी दिवसाच्या सर्व रंगकर्मी व लोककला प्रेमींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# पुस्तकांचा कोपरा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**महात्मा गांधींनी पुस्तकांना माणसाचा सर्वात चांगला मित्र म्हटले आहे, तेव्हा त्याला आजही एक खोल अर्थ आहे. मात्र आज जसे आपण आधुनिक झालो आहोत तसे तंत्रज्ञानाचे गुलाम होत चाललो आहोत. त्यामुळे आपले पुस्तकांपासूनचे अंतर सातत्याने वाढत चालले आहे. शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्याची व्याप्ती वाढली आहे, प्रत्यक्षात पुस्तकांचा आधार असलेल्या शिक्षणापासून विद्यार्थ्यांचे वाढते अंतर हे शिक्षणतज्ज्ञांच्या चिंतेचे कारण ठरत आहे. काळानुरूप शैक्षणिक धोरणे आणि अभ्यासक्रम बदलले आहेत, तरीही विद्यार्थी पुस्तकांशिवाय इतर मार्ग शोधत आहेत.**

उदाहरणार्थ, नोट्स, पासबुक आणि 'वनवीक' सारख्या मालिका इत्यादींच्या मदतीने शिक्षणाची नौका पार केली जात आहे. जर विद्यार्थी पुस्तकांशिवाय उच्च शिक्षण घेत असतील तर ते किती शिकत आहेत किंवा किती ज्ञान मिळवत आहेत? आणि कसल्याप्रकारचे नागरिक बनत आहेत, हा मोठा चिंतेचा विषय आहे. सत्य हे आहे की वाचकांना किंवा विद्यार्थ्यांना सल्ले, व्याख्याने देऊनही ते पुस्तकाभिमुख होताना दिसत नाहीत, कारण वातावरण दिवसेंदिवस पुस्तकविरोधी होत चालले आहे. टीव्हीनंतर आता स्मार्टफोन आणि डेटाचा वापर सहजसुलभ झाल्याने सर्व काही ऑनलाइन झाले आहे. ग्राहकांना यापुढे बाजारात जाण्याची गरज राहिलेली नाही तसे मुलांनाही शाळेत जाण्याची गरज भासेनाशी झाली आहे. कोरोना काळाने कर्मचाऱ्यांना कार्यालयात जाण्याची गरज नसल्याचे दाखवून दिले आहे. 'वर्क फ्रॉम होम' किंवा ऑनलाइन टू वर्क, घरून मीटिंग आणि सर्व प्रकारचे शिक्षण व्हिडीओच्या माध्यमातून घरी बसून केले जात आहे. विद्यार्थी आता ऑनलाईन परीक्षेसाठी जोर देत आहेत. यासाठी आंदोलने झाली आहेत. तासही ऑनलाईन व्हावेत, यासाठी मागणी करत आहेत. अशा परिस्थितीत पुस्तक वाचायला कोण बसेल? फक्त डिग्री मिळायची एवढाच उद्देश आता राहिला आहे.

अशा वेळी पुस्तके कोण वाचत आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. माहितीचा साठा स्मार्टफोन किंवा लॅपटॉपवर उपलब्ध असताना आणि प्रत्येक माहिती देण्यासाठी पाने न उघडता 'गुगल बाबा' सज्ज असताना, मग विद्यार्थ्यांनी पुस्तकासाठी शाळा-कॉलेज किंवा ग्रंथालयात का पोहोचावे? पुस्तकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध असताना ही मंडळी ग्रंथालयांची पायरी का चढतील अथवा पुस्तकांचे कप्पे का धुंडाळत बसतील? युट्युबवर प्रत्येक विषयाचे ऑडिओ-व्हिडीओ आणि प्रत्येक शहरात कोचिंगचे जाळे विणले जात असताना, ग्रंथालये केवळ शोभेच्या वास्तू तर राहणार नाहीत ना? वेळ ही अशी आहे की, तिला कोणत्याही परिस्थितीत मागे वळता येत नाही. हे खरे की, माणसाचा वेग खूप वाढला आहे. कोणाकडेही मोकळा वेळ नाही किंवा कमीत कमी वेळेत आणि कोणत्याही परिस्थितीत यश मिळवायचे आहे. आता लांब आणि सुरक्षित चालण्याचा विचार पूर्णपणे नाहीसा झाला आहे. संयमाचा, समाधानाचा पूर्ण अभाव निर्माण झाला आहे, अशा परिस्थितीत सर्वांना शांतता हवी असते, पण आता ती नाही मिळत, ती फक्त थडग्यातच शक्य होईल, कारण प्रत्येकजण 'उद्या शांतता हवी आहे' म्हणून धावाधाव करत आहे. आज प्रत्येकजण सर्व काही साध्य करण्याच्या, अधिक पैसे मिळविण्याच्या शर्यतीत आहे. अशा परिस्थितीत पुस्तकांचे वाचक होण्याऐवजी ते सतत ऑडिओ-व्हिडिओच्या गर्तेत अडकून राहिले आहेत.

साहित्यात आता कथेला महत्त्व आहे, कादंबरीला नाही. वाचकवर्ग कथेला आहे की कवितेला , हा वादाचा मुद्दा ठरला आहे. दरवर्षी ज्या पद्धतीने कादंबऱ्या येत आहेत, त्यावरून हे सिद्ध होते की, महाविद्यालयांमध्ये पुस्तकांकडे कल कमी झाला असला, तरी साहित्य, कादंबऱ्या या लोकप्रिय प्रकाराचे वाचक आजही कायम आहेत. कादंबरीला सध्याच्या काळातील महाकाव्य म्हटले गेले आहे, हे काही उगीच म्हटले गेले नाही. या पुस्तकविरोधी काळातही मोठ्या प्रमाणावर कादंबऱ्यांचे प्रकाशन आणि वाचन हा कादंबरीला वाचक असल्याचा पुरावा आहे. ज्या वाचकाला वेळ आणि समाज खोलात जाऊन समजून घ्यायचा आहे, तो पुस्तके विकत घेतल्याशिवाय राहत नाही. मात्र विद्यार्थी अभ्यासाला टाकलेल्या कादंबऱ्या न वाचता त्याचे नोट्स वाचण्याकडे अधिक प्रमाणात वळला आहे. त्याला पुस्तके आणि त्यातला भाव जाणून घेण्याची आवश्यकता भासत नाहीत. साहित्याचा वाचक असणे आणि विद्यार्थी वाचक असणे यात मोठा फरक आहे.'एक आठवडा' ( वन विक) या मालिकेतून जे शिक्षक परीक्षा उत्तीर्ण करतात आणि कधी तरी- केव्हा तरी अध्यापन करतात, तेव्हा या युगाच्या वाचनहीनतामागे दडलेल्या संदर्भांचा , कारणांचा सहज शोध घेता येईल. असे पुस्तकाचे वाचक न होणारे शिक्षक नवीन वाचक कसे घडवतील? त्यामुळे या काळात वाचकसंख्या वाढण्यामागे इतरही अनेक कारणे असू शकतात आणि पुस्तकांकडे पाठ फिरवण्याची किंवा पुस्तक संपवण्याची चाललेली प्रक्रिया, त्या सोडवण्याचे मार्गही शोधता येतील, पण वाढत्या तंत्रज्ञानामुळे पुस्तकांच्या विपरीत, बदलत्या विचारसरणी आणि संयम कमी होणे या सगळ्या गोष्टी पुस्तकविरोधी होत चालल्या आहेत. अशा वेळी पुस्तकांचा वाचक असणं वाळवंटातल्या ओएसिसची अनुभूती देतो. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा प्रवासात, जवळजवळ प्रत्येकजणच हातातल्या स्मार्टफोनमध्येच गुंगून गेलेला असतो, जणू काही त्यात सखोल काहीतरी शोध घेत असतो. अशा स्थितीत एखादी व्यक्ती हातात पुस्तक घेऊन वाचताना दिसली, तर जगात काही तरी विचित्र गोष्ट घडत आहे, असे त्या दृश्यातून प्रतीत होत आहे, असं वाटतं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
RNI : MAH/2021/82566, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAH/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आशादायक बालकादंबरी : अर्धा कोयता!


आधुनिक केसरी

**रा. रं. बोराडे अर्थात रावसाहेब बोराडे हे साहित्य क्षेत्रातील एक आदराने घेतले जाणारे नाव! त्यांचे विविधांगी साहित्य सर्वदूर पोहोचले आहे. नुकतीच त्यांची 'अर्धा कोयता ' बालकादंबरी वाचण्यात आली. बोराडे यांच्याप्रमाणेच ख्याती प्राप्त असे प्रकाशन क्षेत्रातील नाव म्हणजे नांदेडचे 'इसाप प्रकाशन'! प्रकाशक दत्ता डांगे हे सर्वोतोमुखी असलेले नाव. बोराडे आणि डांगे यांची निर्मिती म्हणजे एक परमोच्च अशी आनंददायी आणि आकर्षक रचना असणार हे ओघानेच आले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केलेली पाठराखण ह्या विषयाचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. कादंबरीचा आशय स्पष्ट करणारे बोलके चित्र भास्कर शिंदे यांनी चितारले आहे.**

अर्धा कोयता ही बाल कादंबरी म्हणजे प्राजक्ता नावाच्या हुशार, तल्लख बुद्धी असलेल्या आणि शिक्षणाची प्रचंड आवड असलेल्या एका बालिकेची कर्मकथा! मुलींच्या शिक्षणाच्या वाटेवर पसरलेले काटे ती कशी दूर करते याचे मर्मस्पर्शी असे हे कथानक आहे. एका भयाण वास्तवाचे दर्शन घडविताना ही कादंबरी एक वाटही प्रकाशमान करते.लेखकाची सकारात्मक लेखणी आणि प्राजक्ताची शैक्षणिक तळमळ पाहून वाचकाचे मन आनंदाने भरून येते.

प्राजक्ताचे आईवडील हे दोघेही ऊसतोड कामगार! दरवर्षी अनेक महिन्यांसाठी त्यांना घरादारापासून दूर राहावे लागते. प्राजक्ता नवव्या वर्गात जाईपर्यंत ती तिच्या आजी जवळ घरीच राहत असे. त्यामुळे तिची शिकण्याची इच्छा पूर्ण होत असे परंतु दुर्दैवाने तिच्या आजीचा मृत्यू झाला आणि प्राजक्ताच्या कुटुंबासमोर यक्षप्रश्न उभा राहिला. कारण आईबाबा ऊसतोडीसाठी गेल्यावर प्राजक्ताला ठेवायचे कुठे आणि कुणाच्या विश्वासावर हा प्रश्न सतावत असतो. प्राजक्ता गावी राहून शिक्षण घेण्यावर ठाम असते तिथे तिचे बाबा तिला सोबत नेण्यासाठी आग्रही असतात. उमलत्या कळीला नजरेआड ठेवणे त्यांना पटत नाही. सद्य सामाजिक परिस्थितीत असे धाडस करण्याचा विचारही करण्याची त्यांची मनःस्थिती नसते. प्राजक्ताची आई बिचारी द्विधा मनःस्थितीत कुणाचीही बाजू ठामपणे घेऊ शकत नाही कारण परिस्थितीनुरुप दोघांचेही बरोबर असल्याचे तिला जाणवते. परंतु शेवटी वडिलांचे समृद्ध अनुभव विश्व जिंकते आणि एका पराभूत योद्ध्याप्रमाणे प्राजक्ताला आईबाबांबरोबर जावेच लागते.

त्या तात्पुरत्या निवासस्थानी प्राजक्ताच्या शिकण्याच्या इच्छेला जणू पालवी फुटते कारण ऊसतोड मजुरांच्या झोपड्यांपासून काही अंतरावर असलेल्या शाळेचे दर्शन प्राजक्ताला होते. पहिल्याच आईबाबा ऊस घेऊन गेले की ती लपतछपत त्या शाळेत जाते. नवव्या वर्गात शिकवले जाणारे सर्व ती आत्मसात करत असताना शिक्षकाचे लक्ष तिच्याकडे जाते. ते तिला वर्गात बोलावून तिची आस्थेने चौकशी करतात. तिची शिकण्याची प्रामाणिक इच्छा आणि हुशारी पाहून शिक्षकाचे मन द्रवते. ते मुख्याध्यापकांशी चर्चा करतात. तेव्हा मुख्याध्यापक साखरशाळेचे धगधगते वास्तव




अधोरेखित करताना म्हणतात,
'काही ठिकाणच्या साखरशाळा छान चालतात पण अन्यत्र एक ना धड भाराभर चिंध्या अशी अवस्था आहे. आपल्या गावातील साखरशाळा त्या चिंधीतील एक चिंधी...'

मुख्याध्यापकांनी सूचना केल्यानुसार ते शिक्षक कामगारांच्या भेटीला जातात. तिथे प्राजक्ताप्रमाणे इतर मुलांच्या शिक्षणासंदर्भात विचार होत असताना एक कामगार पुन्हा एकदा एक कटू सत्य मांडतांना विचारतो, तुमच्या म्हणण्यानुसार आम्ही उद्यापासून लेकरं शाळेत पाठवू पण आठ पंधरा दिवसात या परिसरातील ऊस संपला की आम्हाला बस्तान हलवावं लागलं तेव्हा लेकरांच्या शाळेचं काय? हे ऐकताच मोठ्या आशेने, तळमळीने आलेले शिक्षक निरुत्तर होऊन परततात.

ऐनकेनप्रकारे हंगाम संपल्यानंतर प्राजक्ता कुटुंबासह गावी येते. मैत्रिणींशी चर्चा करुन अभ्यास पूर्ण करते. मोठ्या आशेने परीक्षेला सामोरी जाते पण व्हायचे तेच होते दरवर्षी प्रथमच क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या प्राजक्ताला त्यावर्षी तिसरा क्रमांक मिळतो. जिथे प्राजक्ता धायमोकलून रडते तिथे तिच्या आईला पोरीचं वर्ष वाया गेले नाही याचा आनंद होतो.

दहावीचे वर्ष! पुन्हा तोच प्रश्न, तीच चर्चा, तोच दुराग्रह! यावेळी प्राजक्ता स्पष्टपणे ऊसतोडणीसाठी जायला चक्क नकार देते. तिचा निर्धार पाहून तिची आईही तिला ठामपणे पाठिंबा देते. तिच्या बाबांची मनःस्थिती गोंधळलेली असताना इच्छा तिथे मार्ग याप्रमाणे एक समदुःखी प्राजक्ताच्या घरी येतो. त्याच्याही मुलीला पुढे शिकायचे असते. दोघे मिळून शहरात जातात. तिथे एका देव माणसाची भेट घेतात. या भेटीची फलनिष्पत्ती काय होते? प्राजक्ताच्या नशिबात शिक्षणाचे दान पडते का तिला ऊस तोड कामगारांच्या अपत्यांच्या माथी असलेल्या शापाला सामोरे जाताना

**नागेश सू. शेवाळकर**
**पुणे, मो. ९४२३१३९०७१**

आपल्या इच्छा आकांक्षांचा बळी द्यावा लागतो या सर्व प्रश्नांची उत्तरे गुरुवर्य रावसाहेब बोराडे यांच्या 'अर्धा कोयता' या कादंबरीत निश्चितच मिळतील. ती त्यांच्याच शब्दात वाचण्यात अवर्णनीय आनंद आहे.

संथ वाहते कृष्णामाई याप्रमाणे लेखक बोराडे यांची लेखणी साधे, सरळ, सुलभ शब्दातून हे कथानक प्रसवत राहते. कुठेही कथानक कंटाळवाणे होत नाही तर उलट वाचनीय नि उत्कंठावर्धक होत राहते. कथानक तसे छोटे असले तरीही आशययुक्त आणि एका प्रमुख समस्येवर प्रकाश टाकणारे आहे. कथानक संपले तरी वाचक बाहेर पडत नाही हे लेखकाचे फार मोठे यश आहे. खूप खूप शुभेच्छा!

**अर्धा कोयता: बालकादंबरी, लेखक : रा. रं. बोराडे**
**प्रकाशक: दत्ता डांगे, इसाप प्रकाशन, नांदेड, 9850099541, मुखपृष्ठ: भास्कर शिंदे**

# मी इंजिनिअर झालो



आहेर वा. र.
संपर्क क्र. : 9958782982

आधुनिक केसरी

**मी प्रवेशअर्ज घेऊन संध्याकाळपर्यंत गावी मुखेडला आलो.४-५ दिवसात गावचे सरपंच,तलाठीआणि हेडसर यांचेकडून तयार करून विविध दाखले घेतले.प्रवेशअर्ज इंग्लीशमध्ये पेन्सिलने भरून हेडसरांकडून तपासल्यावर नंतर पेनने पूर्ण केला.ठरल्याप्रमाणे सोमवारी सायन्स कॉलेज कोपरगावला जाऊन हेडक्लॉर्क श्री.बिरंगळसरांना प्रवेशअर्ज आणि विविध दाखले पोहोच केले.जूनच्या पहिल्याआठवड्यात इंजिनिअरींग कॉलेज पुणे यांचे मला इंजिनिअरींगला प्रवेशासाठी मुलाखतीला बोलावल्याचे पत्र आले.**

मित्रहो, मे १९७४ च्या शेवटच्या सोमवारी इंटर सायन्स परिक्षेचा निकाल लागणार होता. मी सायन्स कॉलेज कोपरगावला मार्कशीट घेण्यासाठी गेलो तेव्हा हेडक्लॉर्क श्री. बिरंगळसरांनी बोलावले. मला मार्कशीट दिलेआणि माझे फर्स्ट क्लास मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. मला इंजिनिअरींगला प्रवेश मिळेल असे ठासून सांगितले. तेथील खर्चाचा विषय काढल्यावर स्कॉलरशीप मिळेल असे सांगून माझे समाधान केले. माझ्या हातात इंजिनिअरींगचा प्रवेशअर्ज दिला आणि पुढील सोमवारी प्रवेशअर्ज पुर्णपणे भरून सोबत मार्कशीट,जन्मतारखेचा दाखला, उत्पन्नाचा दाखला इत्यादी माहितीसह आवर्जून पोहोच करावयास सांगितले. कारण पुढच्या मंगळवारी कॉलेजचा क्लॉर्क १५-२० विद्यार्थ्यांचे अर्ज घेऊन पुण्यास इंजिनिअरींगकॉलेजला जाणार आहे असे सांगितले.

मी प्रवेशअर्ज घेऊन संध्याकाळपर्यंत गावी मुखेडला आलो.४-५ दिवसात गावचे सरपंच,तलाठीआणि हेडसर यांचेकडून तयार करून विविध दाखले घेतले.प्रवेशअर्ज इंग्लीशमध्ये पेन्सिलने भरून हेडसरांकडून तपासल्यावर नंतर पेनने पूर्ण केला.ठरल्याप्रमाणे सोमवारी सायन्स कॉलेज कोपरगावला जाऊन हेडक्लॉर्क श्री.बिरंगळसरांना प्रवेशअर्ज आणि विविध दाखले पोहोच केले.जूनच्या पहिल्याआठवड्यात इंजिनिअरींग कॉलेज पुणे यांचे मला इंजिनिअरींगला प्रवेशासाठी मुलाखतीला बोलावल्याचे पत्र आले.

माझ्या मनामध्ये घरच्या गरीब परिस्थितीमुळे प्रश्नाची नवी मालिका सुरू झाली.तालूक्याच्या ठिकाणी वेगवेगळ्या दाखल्यासाठी कोण मदत करेल, ४ वर्षे शिक्षणासाठी कोण मदत करील, यासाठी श्री. संपतराव पा. आहेर आणि इतर जवळच्यांशी चर्चा केली पण फक्त संपतराव पा. आहेर यांनी मदतीचे आश्वसन दिले.त्याप्रमाणे कुसूरचे मामा श्री. भास्करराव गायकवाड यांनी -प्रथम वर्ग न्यायाधीशांकडून चांगल्या वर्तणूकीचा दाखला,तहसिलदारांकडून डोमेसिल सर्टिफिकेट आणि उत्पन्नाचा दाखला, मेडीकल ऑफिसरकडून फीटनेस सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी मोलाची मदत केली.

घरच्या आईवडीलांनी येसगावच्या काकांना भेटण्यास पाठविले. माझे काका श्री.राहाणेपाटील येसगावला आ.कोल्हेसाहेबांच्या वस्तीवर राहायचे.मी पोहचल्यावर मला इंजिनिअरींगला प्रवेशासाठी मुलाखतीला बोलावल्याचे पत्र आले हे समजल्यावर सर्वांनी आनंद व्यक्त केला. आ.कोल्हेसाहेबांचे बंधु श्री.दत्तुनाना कोल्हे यांनी काकांना इंजिनिअरचे महत्व समजून सांगितले आणि मला इंजिनिअरींगला प्रवेशासाठी मदत करण्याचे काकांना बजावले.मावशी आणि काकांचा माझ्यावर जीव होता.त्यामूळे चांगला हूरूप आला. कोपरगावात माझे वर्गमित्र श्री.रविंद्र नरोडे यांनाही इंजिनिअरींगला प्रवेशासाठी मुलाखतीला बोलावल्याचे पत्र आले होते.त्यांना भेटून पुण्याला जाण्याचा दिवस नक्की केला. त्यांचे वडील श्री.लक्ष्मणराव नरोडे सोबत येणार होते.

अशाप्रकारे प्राथमिक तयारी गावी करून सकाळी येसगावला काकांकडे पोहचलो.

दोन दिवसासाठी पुण्याला उद्या पहाटे जायचे म्हणून काकांनी संध्याकाळी कोपरगावला सायकलवरून नरोडेंच्या घरी मुक्कामाला सोडले.भल्या पहाटे ४वाजता आम्ही तिघे रविंद्र, लक्ष्मणराव आणि मी कोपरगांव पुणे बसने निघालो.१०.३० ला पुण्याला पोहचलो.वेळेवर ११ वाजताइंजिनिअरींग कॉलेजला पोहचलो. दोघांनी सर्व कागदपत्रे सादर केली आणिप्रवेश फीचे पैसे भरून पावती घेतली. कॉलेज १५ जून१९७४ रोजी सुरू होणार आहे आणि होस्टेल प्रवेशाची यादी बोर्डावरलावणार आहे असे कळले. आम्ही एका नव्या पर्वात प्रवेश केला. बराच उशीर झाला होता. रविंद्रचे मेव्हणे प्राध्यापक श्री.शिवाजीराव उगले यांचेकडे पीएमटी बसनेऔंधला मुक्कामाला पोहचलो.त्यांचेकडे मुक्कामात पुण्याची आणि इंजिनिअरींग कॉलेजची प्राथमिकमाहिती मिळाली. दुसरे दिवशी सावकाश कोपरगावला बसनेआलो.पुन्हा १४ तारखेस सकाळी बरोबर पुण्यास बसने जायचे ठरविले.

मी चर्चा विचारणा करण्यासाठीयेसगावहूनमुखेडलाआलो.आतामा झीकपड्यांचीजुळवाजुळवसुरूकेली.बेड,दोन जोडी कपडे आणि असे सर्व जुने सामान एक पत्र्याची पेटीत जमा केले. आमचे चुलत बधुं श्री.संपतराव पा.आहेर यांना भेटल्यावर त्यांनी २५० रूपये देवून दिवाळीला आणखी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर १२ तारखेला येसगावला काकांकडे पोहचलो.माझी सर्व इंजिनिअरींग कॉलेजची तयारी माझेमित्र श्री.नितीन कोल्हे आणि त्यांचे कुटूंबीय यांना सांगितले. श्री.दत्तुनाना कोल्हे यांनी होस्टेल मिळेपर्यंत राहण्याची सोय म्हणून कॅप्टन श्री.पी.आर.शिंदे यांचा औंधपोस्टचा पत्ता दिला.नंतर काकांनी ३०० रूपये मला दिले.सर्वांचे आशिर्वाद घेऊन १४ तारखेस आम्ही तिघे रविंद्र, लक्ष्मणराव आणि मी कोपरगांव पुणे बसने पुण्यास निघालो. पुण्यास पोहचल्यावर पीएमटी बसने ते औंधला उतरले आणि मी औंधपोस्टला गेटवर उतरून कॅप्टन श्री.शिंदेसरांचा पत्ता विचारत त्यांचेकडे पोहचलो. कॅप्टनसाहेबांना दत्तुनाना कोल्हे यांचा निरोप सांगितला. कॅप्टनसाहेबांनी माझे स्वागत करून इंजिनिअरींगला प्रवेशमिळाल्याबद्दल अभिनंदन केले. होस्टेल मिळेपर्यंत इथेच राहण्याचा आग्रह धरला.ते सीऔइपीत इंजिनिअर झालेअसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्व अडचणी जाणून होते. त्यांचेसमवेत बोलून सर्व शीण गेला.

१५तारखेला बसने कॉलेजला जाऊन रोल नं. टाईमटेबल नोंद केले. होस्टेल प्रवेशाच्या पहिल्या मेरिट लीस्टमध्ये माझे नाव नव्हते. दुसरी लीस्ट ८दिवसाने लागेल असे समजले. सांयकाळीकॉलेज सुटल्यावर औंधपोस्टला कॅप्टनसाहेबांकडे गेलो. त्यांनी होस्टेल मिळेल असा आशावाद व्यक्त केला. दरम्यान कॅप्टनसाहेबांनी जेवण्यासाठी मेस प्रवेशासाठी विद्यार्थी सहायक समिती पुणे यांना पत्र दिले.ते पत्र घेऊन समिती ऑफीसमध्ये जाऊन एक महिन्याचे डिपॅझिट भरून फर्ग्युसन कॉलेज कॅंप्स मधील मेसमध्ये दाखल झालो. कॅप्टनसाहेबांचे संध्याकाळी आभार मानले.कॉलेजमध्ये नरोडे आणि तर कोपरगावच्या कॉलेजमित्रांची ओळख झाली. सोमवारी लागलेल्या होस्टेल प्रवेशाच्या दुसरे मेरिट लीस्टमध्ये माझे नाव होते.रवि नरोडे आणि मी सोबतच होस्टेलमध्ये जाऊन होस्टेलफी भरून रूम ताब्यात घेतली. रवि नरोडे आणि मी पार्टनर झालो.कॅप्टनसाहेबांनी होस्टेलमध्ये त्यांचे नातेवाईक नारायण डावखर सेकंड ईयरला होते. त्यांना पुस्तके मला देण्यास सांगून माझा आर्थिक भार हलका केला.

होस्टेलमध्ये रूमवर दुसरे दिवशी कॅप्टनसाहेबांचा निरोप घेऊन दाखल झालो.नवीन ठिकाणी सुरूवातीला बुजल्यासारखे झाले. ग्रामीण भागातून आल्यामुळे काही नवीन गोष्टी समजण्यास वेळ लागत होता,अडचणी येत होत्या.जेवणासाठीची फर्ग्युसन कॉलेज कॅंप्स मधील मेस बरीच दुरवर असल्याने पायपीट करावी लागणार होती.

प्रथम वर्षाला लागणारे ड्राईंग बोर्ड, मिनी ड्रॉफ्टर ,वर्कशॅप टूल,स्लाईड रूल ,जर्नल ,जॉमेट्री बॉक्स घेणे आवशक होते. जवळपास सर्व सामान सेकंडहॅंड मिळाल्याने बरीच बचत झाली. यथावकाश होस्टेलमधील प्रथम वर्षाच्या मुलांचीओळखीझाल्या. त्यातरेगे,नरोडे,थोरात,लोखंडे,पाटील,मोरे,अभ्यंकर,जाधव,चौधरी,पवार,कुलकर्णी,गांगुर्डे,मरकळे,बोंडे,परदेशी,एकबोटे,डाके,दुरूगकर,म्हात्रे,सुराणा,अगरवाल हे प्रामुख्याने होते.होस्टेलमध्ये सिनिअर मुलांना मान देऊन अदबशीरपणे वागण्याचा रिवाज आहे.

कॉलेजमध्ये श्री. व्ही. डी. कराडसर, डी. डी. दराडेसर, सांवतसर, देशपांडेसर, नवलेसर, भंडारीसर, डी. के. जोशीसर, खाडीलकर सर यांच्यासारखे आणखी विद्वानसर भेटले.

विद्यार्थी,कॉलेज आणि होस्टेलमध्ये अप्रत्यक्षरित्या शहरी-ग्रामीण तसेच,नासिक,नगर ,खानदेश अशा प्रकारच्या विभागलेले दिसले. कॉलेजात मासिक परीक्षा प्रत्येक शनिवारी दोन विषयांची टेस्ट होत असल्यामुळे लवकरच अभ्यासाचे रूटीन सुरू झाले. वर्कशॉप प्रॅक्टीकल,ड्रॉईग प्रॅक्टीकल,सर्वे प्रॅक्टीकल यात दिवस जात होते. रविवारी कपडे धुणे, इस्त्री करणे, ओळखीच्या भेटीगाठी घेणे यातच जायचा. कॉलेजात सरकारी स्कॉलरशिप नुतनीकरणास अर्ज भरून दिले. तसेच मी डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीच्या लोन स्कॉलरशिपचेही फॉर्मभरले.अशा रितीने फर्स्ट टर्म संपून परिक्षेनंतर दिवाळीची सुट्टी लागली. सेकंड टर्मला मला माझे काका आणि संपतराव आहेर यांनी मिळून ६००रू दिले.कोल्हेसाहेबांकडून ड्रेस मिळाला.सोबत माझेमावसभाऊ कारभारी राहाणे पुण्याला आले.त्यांचे ओळखीचे नाटेगावची मोरे फॅमिली बालगंधर्व चौकात राहात . त्यांची ओळख करून दिली आणि माझी भोजनव्यवस्था मोरे फॅमिलीत दरमहा४५ रूपये प्रमाणे केली.माझा जेवणासाठीची फर्ग्युसन कॉलेज कॅंप्स मधील मेसचा फेरा वाचला.

तेव्हा मला दरवर्षीच्या खर्चाचे नियोजन कळत नव्हते,पण आज मी त्याचा तपशील देतो.४वर्षाचा खर्च आणि मदत साधारणपणे असा आहे.

काका श्री.राहाणेपाटील-रू.२०००
संपतराव आहेर-रू.२०००
नॅशनल स्कॉलरशीप रू.३८७०
डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीच्या लोन स्कॉलरशिप-रू.८००
संजीवनी साखर कारखाना ट्रेनिंग एकुणअनुदान-रू.४००
एकूण खर्च-रू.९०००

असा हा चार वर्षाचा प्रवास खुप मोलाचा अनुभव देऊन गेला. ऑगष्ट १९७८ मध्ये बी.ई. चा रिझल्ट लागला. मी चांगल्या मार्कानें पास झालो. सर्वांना खुप आंनद झाला.आ.कोल्हेसाहेबांची भेट घेतल्यावर त्यांनी संजीवनी साखर कारखान्यात अप्रेंटीस इंजिनिअर म्हणून नोकरी दिली.

असा हा माझा इंजिनिअर होण्याचा प्रवास झाला.

# भारतातील रोजगार प्रश्न : स्वरुप आणि समस्या



डॉ . आर. बी. भांडवलकर
अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद

आधुनिक केसरी

**मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी एकमताने अविरोध निवड करून मला जो सन्मान दिला त्याबद्दल सर्वप्रथम मी परिषदेच्या सर्व सन्माननिय सदस्यांचा मनापासून आभारी आहे. तसेच आपल्या ऋणात राहण्याचा माझा सदैव प्रयत्न राहील अशी ग्वाही देतो. दिनांक ९ जानेवारी १९७७ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील या ऐतिहासिक आणि उज्ज्वल परंपरा असलेल्या परिषदेचा मी एक वारकरी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विकासात आणि जडणघडणीत संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी यांच्यासह आजपर्यंत पार पडलेल्या वार्षिक अधिवेशनाचे सर्व माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह खजिनदार, अर्थसंवादचे संपादक, विश्वस्त, त्याचबरोबर आजीव सदस्यांचे फार मोठे योगदान परिषदेला मिळाले आहे. नव्हेतर मराठी अर्थशास्त्र परिवारातील या सर्व सदस्यांनी परिषदेच्या उद्देशाशी बांधिलकी राखून समर्पित भावनेने केलेल्या कार्यामुळेच परिषदेला समाजमान्यता प्राप्त झाली आहे.

मी अध्यक्षीय भाषणाचा विषय आजच्या दोन ज्वलंत समस्या वाढती महागाई आणि बेरोजगारी या विषयावर केंद्रित केला आहे. **भारतातील रोजगार प्रश्न :** स्वरूप आणि समस्या हा विषय हेतूपूर्वक निवडला आहे. सद्यःस्थितीत तो सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. समाजवादी समाजरचनेमध्ये वर्गविरहीत समाजरचना, आर्थिक समानता आणि न्याय यांना प्राधान्य देण्यात आले. परंतु बेकारी ही समस्या संपूर्ण जगाच्या अर्थकारणांची, समाजकारणांची आणि राजकारणाची महत्वाची समस्या बनली आहे.जगातील लोकसंख्येच्या १७.७ टक्के लोकसंख्या भारताची आहे. प्रत्येक देशाच्या दृष्टीने त्यांची मानवी संसाधन हे खूप महत्वपूर्ण असते. भारतात अंदाजे २०-२२ वर्षापूर्वी प्रतिवर्षी साधारणतः अडीच कोटी मुले जन्माला आलीत. त्यापैकी ९५ टक्के मुले ज्यांचे वयोमान २१-२२ वर्षे आहे ती आता तारूण्यांच्या उंबरठ्यावर आहेत.तर २० वर्षे पेक्षा कमी वयाचे ५४ कोटी तरुण आहेत. हे प्रमाण लोकसंख्येच्या ४१ टक्के आहे. ही सर्व तरूण मंडळी श्रमिक बाजारात नोकरीच्या शोधात आहे. लोकसंख्येच्या बदलत्या वयोसंरचनेमुळे कार्यकारी लोकसंख्येत वेगाने वाढ झाली त्यामुळे पर्याप्त रोजगार निर्मिती हे अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासात्मक आव्हानांना सामोरे जातांना आढळून येते भारताने गेली ७५ वर्षे आर्थिक प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नानंतर दारिद्र्य, विषमता आणि बेरोजगारी हे मूलभूत प्रश्न गुणात्मकतेने आणि समाधानकारकपणे सुटलेले नाहीत उलट प्रश्न सोडविण्याऐवजी प्रश्नच समस्या बनत गेल्याचे चित्र दिसून येते.

अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मिती होत नाही ही समस्या नसून जे रोजगार निर्माण होतात ते कमी गुणवत्तेचे असतात ही खरी समस्या आहे. नियोजित औद्योगिकरण, बाजाराभिमुख आर्थिक सुधारणा किंवा सन १९९० नंतर नियोजनाचा केलेला त्याग आणि नीती आयोगाची स्थापना या कोणत्याही उपायातून भारतातील रोजगाराची समस्या सोडविता आली नाही.

भारतासारख्या राष्ट्रात बेरोजगारीचा प्रश्न दीर्घकालीन आणि तीव्र स्वरुपाचा आहे. २० व्या शतकातील शिक्षण २१ व्या शतकात रोजगार देण्यास पुरेसे ठरले नाहीत नासकॉमच्या सर्वेक्षणानुसार ९० टक्के स्नातक आणि ७५ टक्के अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केलेले विद्यार्थी बेरोजगार आहेत. सध्या आपल्या देशात ६.८ कोटी बेरोजगार पदवीधारक तरुण बिगर तांत्रिक पार्श्वभूमी असलेले आहेत. देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या पूर्ण १० वर्षे शाळेत जात नाही हे आजही दुर्दैवाने सांगावे लागते म्हणून रोजगार आणि शिक्षण यामध्ये सांगड घालण्याची गरज निर्माण झाली आहे. एकंदरीत आर्थिक वृध्दीदर वाढल्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतील हा समज चुकीचा असलेला दिसून येतो. यामुळे आज भारतातील रोजगारी व बेरोजगारी हया दोन्ही घटकांचे मनुष्यबळ विभागाकडून मूल्यमापन होणे आवश्यक आहे. भारतात सध्या निर्माण झालेल्या रोजगारापैकी ६८ टक्के रोजगार असुरक्षित स्वरुपाचा आहे. बहुतांश रोजगाराचे स्वरुप अनौपचारिक किंवा असंघटित स्वरूपाचे आहे.

रोजगार हा काम करणाऱ्या व्यक्तीला उत्पन्न देतो. म्हणजेच रोजगार हा व्यक्तीला उपजिविकेचे साधन तर देतोच परंतु तिची अस्मीता जपण्यासाठी किंवा या व्यक्तीला समाजात मान्यता मिळण्यासाठी एक महत्वाचा घटक ठरतो रोजगार म्हणजे उत्पन्न मिळविण्यासाठी मानवाने केलेले शारीरिक व बौध्दिक प्रयत्न किंवा कार्य होय. आज रोजगाराची समस्या अतिविकसित ते अविकसित अशा सर्वच अर्थव्यवस्थांना ग्रासणारी समस्या झालेली आहे. रोजगाराचे समाजावर अनेक विधायक आणि बेरोजगारीचे विघातक परिणाम होत असतात.

देशात निर्माण झालेला रोजगार संपूर्णतः अर्थचक्र गतिमान ठेवतो कारण रोजगारातून व्यक्तीला उत्पन्न प्राप्त होते त्यामधून खर्च केला जातो पर्यायाने वस्तू आणि सेवांची मागणी वाढते तर उत्पन्नाचा काही शिल्लक भाग बचत केला जातो आणि नवीन गुंतवणूक निर्माण होते. म्हणजे उत्पादन- रोजगार- उत्पन्न- बचत-गुंतवणूक असे अर्थचक्र सतत चालू राहते परंतु आजचा निर्माण होणारा रोजगार हा सर्वसमावेशी नाही आणि खऱ्या अर्थाने मनुष्य जीवन समृद्ध करणारा देखील नाही. आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO) श्रमिकांच्या प्रश्नांची, रोजगाराच्या स्थितीची दखल आपल्या अहवालात नियमीतपणे घेत असते. तसेच मानव विकास अहवालात रोजगाराचा विशेषत्वाने विचार होताना दिसतो. रोजगार वाढ किंवा क्षेत्राचा अभ्यास करतांना महत्वाचा घटक म्हणजे बेरोजगारी हाच आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील बेरोजगारीचे स्वरूप विकसित देशापेक्षा वेगळे आहे. भारतातील संघटित क्षेत्रात केवळ २.४ कोटी, आणि असंघटित क्षेत्रात १०.६ कोटी रोजगार आहेत. सर विल्यम बेवरीज या विचारवंताच्या मते, कामगारांनी रोजगाराची प्रतिक्षा करण्याऐवजी कामाने कामगारांसाठी प्रतिक्षा केली पाहिजे.

अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलानुसार रोजगार निर्मितीमध्येही क्षेत्रनिहाय बदल होत गेला. अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्राकडून औद्योगिकीकरणाकडे, औद्योगिकरणाकडून सेवा क्षेत्राकडे वळत गेली. त्याचवेळी रोजगार क्षेत्रही बदलत गेले. या बदलांचा परिणाम भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मात्र असंघटित क्षेत्रातील (कृषीक्षेत्र) श्रमिकांच्या कार्यात व जीवनमानात फारशी सुधारणा न होता विषमता वाढत गेली. या बदलांचा परिणाम भारतामध्ये दारिद्र्य वाढविण्यात झाल्याचे दिसून येते. असंघटित श्रमिकांना कोणत्याही प्रकारची कामे करावी लागतात तर कोणत्याही कामाचा मिळणारा मोबदला हा अत्यल्प असतो.

सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांच्या मते, भारतात आर्थिक सुधारणेत्तर काळात सर्वत्र रोजगार विरहीत वृध्दी JOBLESS GROWTH घडून येतांना दिसत आहे.

कोणत्याही देशाच्या विकास आणि प्रगतीत कारखानदारीचा वाटा लक्षणीय असतो. भारतात सेवा क्षेत्रामधून मोठी रोजगार निर्मिती झाली परंतु असंघटितपणा आणि असुरक्षिततेमुळे या क्षेत्रातील रोजगारावर टांगती तलवार आहे. दुसरीकडे एकूण रोजगारातील कृषी क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण हळूहळू कमी होत अधिकतर शेतकरी जे कृषिक्षेत्रातून बाहेर पडले ते प्रामुख्याने कृषिश्रमिक AGRICULURE LABOUR झालेत.

रोजगाराची पातळी ही एकूण मागणी फलनावर अवलंबून असते आणि मागणी फलन उपभोग, गुंतवणूक व सरकारी खर्च या तीन घटकांवर अवलंबून असतो. एकूण मागणी फलन व एकूण पुरवठा फलन यांचे अर्थव्यवस्थेत जेथे संतुलन होईल किंवा ह्या दोन घटकांमध्ये ज्या रोजगाराच्या पातळीला संतुलन घडून येईल तेवढाच रोजगार निर्माण होईल.भारतामध्ये कामगार मागणीची लवचिकता अत्यंत कमी म्हणजे केवळ ०.२ आहे. त्यामुळे आर्थिक वृद्धी जरी झाली तरी रोजगार निर्मिती मंद गतीने होते. आर्थिक वृद्धीदर वाढल्यास रोजगार निर्मिती होते व बेरोजगारी कमी होत जाते असे अर्थतज्ञांचे मत आहे. देशात आर्थिक वृद्धीदर वाढत असताना, आणि सेन्सेक्स वाढत असतांना रोजगार कमी होत आहे. पर्यायाने बेरोजगारी वाढत आहे. ही स्थिती निश्चितच अर्थशास्त्रज्ञांना आणि आपल्या सारख्या अभ्यासकाना विचार करायला लावणारी आहे.

यंत्राच्या वापराचा अतिरेक झाला की स्वतःची बुद्धी चालविण्याच्या माणसाच्या वृत्तीला आळा बसतो आणि तो पण एक निर्जीव यंत्र बनतो. यंत्र हे माणसाच्या बुद्धीनेच तयार होते हे खरे आहे. परंतु यंत्र कमी श्रमात जास्त उत्पादन करते आणि हे उत्पादन संपावे म्हणून कृत्रिम गरजा निर्माण करण्यात येतात. तसेच यंत्राच्या साह्याने एक जण संपत्तीत लोळतो तर हजारो अधिक दुःखी बनत जातात सामान्य जनता गुलामांच्या पायरीला आणून बसविली जाते. बहुसंख्य गरीबांकडे श्रम ही एकमेव संपत्ती असते तर दुसरीकडे श्रमिकांना पर्याय म्हणून भांडवलाचा वापर केला जातो. कृषी क्षेत्राच्या संदर्भात जे तरूण कृषी क्षेत्र सोडून शहरात नोकरीच्या निमित्ताने गेले त्यांचा सातत्याने भ्रमनिरास होत आहे. जागतिक बँकेच्या निरीक्षणानुसार यंत्राच्या वापरामुळे भविष्यात भारतातील रोजगार संधी ६९ टक्क्यांनी कमी होणार आहे. भारतातील बेरोजगार वृद्धीस यंत्रवापर मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे.

सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमीच्या म्हणण्यानुसार भारतातील बेरोजगारीचा दर सुमारे ७ ते ८ टक्के आहे. जो पाच वर्षापूर्वी ५ टक्के होता. त्याच वेळी कमकुवत व अस्थायी नोकरीच्या संधीमुळे निराश झालेल्या लाखो लोकांना बाहेर काढल्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाली ही परिस्थिती कोविड-१९ च्या लॉकडाऊनमुळे बिकट झाली आहे. दुर्दैवाने बेरोजगारीच्या वाढीची वास्तविकता बेरोजगारीच्या अधिकृत आकडेवारीमध्ये दिसून येत नाही. जागतिक स्तरावर सर्वात जास्त बेरोजगारी भारतात आढळून येत आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्था संक्रमणावस्थेत असून दररोज रिकाम्या हाताची भर त्यामध्ये पडत आहे. तेव्हा लोकसंख्येला अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी त्यांच्याकरीता योग्य आणि पुरेशा कामाची निर्मिती करण्याची सरकारची जबाबदारी आहे.असे न केल्यास आर्थिक विषमता वाढीस लागेल आणि अराजकता वाढण्यास वेळ लागणार नाही. अर्धकुशल श्रमशक्ती हा मोठा अडथळा देशाच्या सर्वांगीण विकासात ठरू पाहत असतांना शासनाच्या उपाययोजनातून असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना विविध योजनाच्या माध्यमातून ज्या फुकट सुविधा मिळतात त्यातून आळशी आणि सुप्त बेकारी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे.तसेच भारतात होणारी रोजगार निर्मिती निकृष्ट दर्जाचा रोजगार उपलब्ध करून देत आहे. मनरेगा सारख्या योजनामध्ये कोणत्याही राज्यात स्त्रियांना १०० दिवस रोजगार मिळत नसल्याने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात स्त्रिया बेरोजगार आहेत. भारतातील बेकारीचे मापन ही एक जटील समस्या आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील BSNL, MTNL, VSNL AIR INDIA, BHARAT PETROLIUM, INDIAN OIL, RAILWAY, AIR PORT, PRADHIKARAN, ONG, SAIL, BHEL, इत्यादी मूलभूत व अवजड उद्योगाचे मोठ्या प्रमाणात सरकारच्या माध्यमातून खाजगीकरण झाल्यामुळे कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी नष्ट झालेल्या आहेत. तसेच सरकारी कंपन्यांच्या विक्रीमुळे सरकारी नोकऱ्यात प्रचंड कपात होत आहे. वास्तविक रोजगार निर्मिती प्रत्येक आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू असावा त्याकरिता संघटित क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशाची समस्या आणि समस्येचे स्वरूप वेगळे असल्यामुळे केवळ तुटीच्या अर्थभरणा सारख्या उपायाने रोजगार वृद्धी होईल हा केवळ भ्रम आहे. कारण गेल्या दशकामध्ये श्रमशक्तीची वाढ आणि रोजगार वृद्धी यामध्ये फार मोठी तफावत सतत वाढत आहे.

**(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)**

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन जालना येथे ५, ६ व ७ नोव्हेंबर रोजी आर. जी. बगडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे संपन्न होत आहे त्यानिमित्त अध्यक्षीय भाषणाचा सारांश.**

**मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।**

# नेटिझन्स - जनरेशन-झी आणि जनरेशन-अल्फा

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

सर्वाधिक महत्त्वाची सहावी काळजी म्हणजे तुमच्या व्हाट्सअपवर, ट्विटरवर, इंस्टाग्रामवर, स्नॅपचॅटवर फेसबुकवर एसएमएस वर आलेली नवीन लिंक किंवा अविश्वासनीय लिंकवर लगेच क्लिक करू नये. जर ती लिंक खात्रीशीर नसेल तर शक्य झाल्यास तिची तक्रार सायबर सेल ला करावी आणि नाहीच केली तक्रार तर मुळीच तिला बळी पडू नये कारण बऱ्याचदा ह्या लिंक तुमच्या पेमेंट ॲप ची माहिती चोरण्यासाठी असते अथवा तुमच्या फोनमध्ये व्हायरस इन्स्टॉल करण्यासाठी असतात त्यामुळे अशा अनोळखी लिंकवर क्लिक करणे टाळावे.

अशा विविध प्रकारच्या अनेक परंतु उपयुक्त सावधगिरींचे पालन आपल्याला स्मार्टफोन वापरताना करता येईल त्यातील ह्या सहांचे निश्चितच पालन केले पाहिजे परंतु याने फार मोठा बदल घडून येणार नाही त्यासाठी आपल्याला काही मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये व नैतिक मूल्ये यांचे सुद्धा पालन करावे लागेल जेनेकरून आपण एक जागरूक इंटरनेट उपभोक्ता बनू जसे की,

1) तुमच्या द्वारे इंटरनेट वर टाकल्या जाणाऱ्या प्रत्येक पोस्ट बद्दल सावध राहा. आक्षेपहार्य असल्यास ती पोस्ट किंवा डाटा ऑनलाईन जाऊ देवु नका. अन्यथा कायदेशीर परिणाम भोगावे लागतील.

2) इंटरनेटला मराठीमध्ये अंतरजाळ म्हणतात म्हणजेच आपण सर्व याच्या अदृश्य धाग्यांनी जोडल्या गेलेलो आहे त्यामुळे जे काही पोस्ट करणार आहोत किंवा आपले मत मांडणार आहोत ते अत्यंत काळजपूर्वक मांडा ज्यामुळे इतरांच्या भावना दुखावल्या जाणार नाही. तुमचा एक विचार संपुर्ण जग बदलू शकतो.

3) खोट्या बातम्या शेअर करून त्यांना अधिक वाव देऊ नका. ही आपल्या सर्वांची ऑनलाईन नागरिक म्हणून नैतिक आणि सामाजिक जबाबदारी बनते. या खोट्या बातम्यांनी एक विशिष्ट समूह तयार होतो व त्या समूहासाठी ह्या खोट्या बातम्याच अंतिम सत्य असतात. यांचे मन परिवर्तन घडवून येई पर्यंत विविध असामाजिक घटना घडतात.

4) जे सत्य असेल तेच सांगा. तुमच्या लाईक फॉलोवर कमेंट्स साठी सत्याला कल्पनिकतेची जोड देऊ नका. आजची पिढी विचार करण्यावर जास्त वेळ खर्च करत नाही व असल्या अफवांना सहज बळी पडतात.

5) इतरांनी तुम्हाला पाठवलेली पोस्ट किंवा संदेश याच्या स्त्रोताची पडताळणी केल्याशिवाय ती पोस्ट पुढे फॉरवर्ड करू नका. अशी अविश्वसनीय पोस्ट फॉरवर्ड केल्याने खोट्या बातम्या अफवा यांना अधिक प्रोत्साहन मिळते त्यामुळे त्या माहितीचा स्त्रोत अधिप्रमाणित आहे की नाही हे बघा. शक्यतो अशा पोस्ट फॉरवर्ड करा ज्या एखाद्या कार्यालयातून किंवा एखाद्या पदाधिकाऱ्याकडून आलेल्या असतील. या सवयीमुळे समाजातील एक्य टिकून राहण्यास खूप मदत मिळते.

6) इंटरनेट गुन्हेगारी व इंटरनेट इंटरनेट छळवणूक पासून दहा हात लांब दूर उभे रहा. सध्या ऑनलाईन कम्युनिटीमध्ये या दोघांचे प्रमाण अधिक वाढल्याचे दिसत आहे. काही घटक मुलांचे-मुलींचे मिम्स (MEMES) तयार करून त्यांना व्हायरल करतात तसेच मुलांचे-मुलींचे अश्लील चित्रफित तयार करून त्यांना समाज माध्यमावर प्रकाशित करतात त्याचबरोबर या प्रकारच्या चित्रफीत तयार करून पैसे उकळण्यासाठी धमक्या देतात. बहुदा अशा घटनांचा परिणाम मानसिक आघात करून जातो आणि बरेच मुले-मुली यातून मुक्तता म्हणून आत्महत्येचा पर्याय निवडतात.

7) तुमच्याजवळ एखाद्या विषयाचे विशेष ज्ञान व नैपुण्य असेल तर ते इंटरनेटवर पोस्ट करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा तसेच पूर्वीपासूनच असलेली एखादी चुकीची पोस्ट किंवा ब्लॉग असेल तर त्यात दुरुस्ती करा. तुमच्या जवळील विशेष ज्ञानाचा फायदा हा संपूर्ण जगाला होऊ द्या त्यामुळे विद्यार्थी वर्गांचा प्रचंड प्रमाणात फायदा होईल व त्यांना तथ्य स्वरूपातील माहिती मिळेल. येणाऱ्या काही काळामध्ये अशा प्रकारची विशेष माहिती पुरविणे ही देखील सामाजिक सेवाच असेल.

असे बरेच मार्गदर्शक तत्वे व मूल्ये आपण विचारात घेऊ शकतो परंतु फक्त या तत्त्वांनी आणि मूल्यांनी इंटरनेट हे एक सुरक्षित स्पेस बनू शकेल का? कदाचित बनेलही परंतु निश्चित सांगता येणार नाही शिवाय हे ही खरेच की या तत्त्वांनी इंटरनेट बऱ्यापैकी सुरक्षित बनेल. तसेच विश्वासनीयता व सुरक्षितता वाढवण्यासाठी आपण इंटरनेट यूजर साठी काही अटी घालू शकतो, यावर कोणी "मूलभूत हक्कांवर गदा" अशी टीका करू नये म्हणजे झाले! आपण मतदानासाठी, रस्त्यावर वाहन चालवण्यासाठी, मद्यपान करण्यासाठी तसेच सामाजिक ठिकाणी वावरण्यासाठी विविध नियम व अटी घालतो त्याचप्रमाणे इंटरनेट वापरासाठी सुद्धा काही विशेष अटी व नियम असायला हव्या मी या मताचा. ह्या नियमावलीमुळे इंटरनेटवरील काही समाजकंटक गट असक्रिय होतील व आपली सामाजिक एकता अबाधित राहील तसेच सामाजिक आरोग्य ठणठणीत राहील. सुरुवातीला हे नियम-अटी आपल्या मूलभूत हक्कांवर बंदीच वाटेल परंतु कालांतराने यातून होणाऱ्या फायद्यांमुळे आपल्याला याची सवय होईल व यातूनच आपल्या मूलभूत हक्कांमध्ये होणारा हस्तक्षेप थांबण्यास काही प्रमाणात मदत होऊ शकते.

सर्वप्रथम असायला पाहिजे वयाची अट. इंटरनेटचा "खुला" वापर करण्यासाठी कमीत कमी सोळा वर्षे वयाची अट आवश्यक असायलाच पाहिजे. खुला वापर नेमका आहे तरी काय? खुला वापर म्हणजे ज्या वापरावर कोणतेही बंधन नाही तो मग तो वापर शिक्षणासाठी, मनोरंजनासाठी, संशोधनासाठी अथवा इतर काही वापरांसाठी असेल. यामुळे नेटिझन्सला आपण नेमकं काय करतो याचा समज आलेला असेल, त्याचबरोबर काही सायबर गुन्हे घडले असतील तर त्यात अल्पवयीन म्हणून पळवाटही नसेल. ज्यांचे वय 16 वर्षांपेक्षा कमी असेल त्यांना "प्रतिबंधित" वापर करायला मिळेल म्हणजेच त्या व्यक्तींसाठी काही संकेत स्थळ (WEBSITES) व सामाजिक माध्यमं यावर बंदी असेल. यामध्ये प्रामुख्याने ते संकेतस्थळ असतील ज्यामध्ये 18+ कॉन्टेन्ट, प्रक्षोभक दृश्य, अश्लील भाषा तसेच विशेष करून अतिरेक्यांनी प्रसारित केलेली कोणतीही सामग्री मग ती चित्र स्वरूपात असो अथवा चल अथवा ध्वनी स्वरूपात असो. हल्ली फेसबुक वर अल-कायदा सारख्या संघटनांनी त्यांचे व्हिडिओ व्हायरल करून आपल्या देशातील तरुणांना भटकवण्याचे आणि त्यांच्या संघटनात सामील करून घेण्याचे डावपेच यशस्वीरित्या खेळलेले आहेत. जर ही अट घातली तर राष्ट्र सुरक्षतेत मुबलक प्रमाणात मदत होईल.

दुसरी अट ही इतरांची वैयक्तिक गोपनीयता अबाधित ठेवण्यासाठी खूपच उपयुक्त आहे. मोबाईल मधील "शटर-बटनचा" आवाज आणि फ्लॅश यांना चालू किंवा बंद करण्याचा पर्याय मोबाईल उत्पादक कंपन्यांनी देऊ नये. बऱ्याचदा काही व्यक्ती गमतीमध्ये तर काही जाणून-बुजून इतर लोकांचे खास करून महिलांचे लपून-छपून फोटो काढतात ह्या असल्या असामाजिक आणि असंस्कृत कृत्यांवर बंदी घालण्यासाठी ही अट सरकारनेच ह्या कंपन्यांवर लादली पाहिजे. जपान आणि कोरिया या देशातील सरकारने कायदाच करून ही अट खूप पूर्वीपासून अमलात आणलेली आहे ज्याद्वारे तेथील सरकार अश्लील चित्रफीत आणि फोटो यांना आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

**(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)**

# विसरभोळे

आधुनिक केसरी



एक होतं गाव. त्या गावात एक विसरभोळा राहत होता. तुम्ही म्हणाल हा विसरभोळा म्हणजे तरी कोण? बिलकुल तुमच्याच वयाचा. दहा-अकरा वर्षांचा मुलगा. खरं पाहिलं तर त्याचं नाव होतं संजय. त्याच्या लक्षात कोणतीच गोष्ट राहत नसे. अगदी सकाळची गोष्ट दुपारपर्यंत तो पार विसरून जायचा. मग सर्वांना त्याची गंमत वाटायची, म्हणून त्याला गमतीनं सर्वजण 'विसरभोळे' म्हणत. हा विसरभोळे विसराळू तर होताच शिवाय कोणतंही काम करताना गडबड फार करायचा. त्याच्या या स्वभावाला त्याचे आई-बाबा जाम वैतागून गेले होते, पण करता काय ?

विसरभोळे होता बसक्या नाकाचा व ठेंगू. रंगानं तसा तो काळाच होता; परंतु पावडर लावली, की बरा दिसायचा. हाफ पँट आणि हाफ शर्ट, गळ्यात रुमाल, असा त्याचा अवतार. अशी ही स्वारी मोठ्या दिमाखानं शाळेत जायची. विसरभोळे अभ्यासात हुशार होता बरं का ! दरवर्षी त्याचा पहिला किंवा दुसरा क्रमांक यायचा.

एकदा खूपच मजा आली. बाबांनी त्याला लाँड्रीवाल्याकडून कपड्यांना प्रेस करून आणायला सांगितलं. तेव्हा तो अभ्यास करण्याच्या नादात होता. त्यानं ऐकल्यासारखं केलं व होकारार्थी मान हालवली. अभ्यास झाल्यानंतर तो आपल्या मित्रांसोबत विटीदांडू खेळायला निघून गेला. त्याच्या लक्षात ती गोष्ट राहिलीच नाही.

दुसऱ्या दिवशी बाबांना ऑफिसच्या कामानिमित्त तालुक्याच्या गावी जायचं होतं, म्हणून बाबा दुसऱ्या दिवशी लवकर उठले. अंघोळ करून कपडे पाहतात, तर जशास तसे. मग काय ? विसरभोळेला चांगला पोटभरून मार मिळाला. एवढंच नाही तर त्या दिवशीचा सकाळचा चहासुद्धा मिळाला नाही.

एकदा विसरभोळे टी. व्ही. पाहत बसला होता. कार्यक्रम पाहण्यामध्ये अगदी तल्लीन झाला होता तो. इकडे आई चहा करण्यासाठी स्टोव्हला पंप मारू लागली, पण तेल काही येईचना! त्यात तेल नसल्याचं नंतर तिला कळून चुकलं. एक डबा विसरभोळेच्या शेजारी ठेवत ती म्हणाली, "हे बघ, आता टी. व्ही. पाहणं बंद कर बघू. हा डबा घेऊन वाण्याच्या दुकानात जा आणि रॉकेल घेऊन ये."

तो टी. व्ही. पाहण्याच्या नादात असल्यामुळे त्यानं अर्धवट ऐकलं. त्यानं पायांमध्ये चपला घातल्या व गाणं गुणगुणत दुकानाकडे पळत सुटला. पळता पळता त्याच्या चपलेचा अंगठा तुटला. मग त्याला काही पळता येईना. 'असा कसा बरं अंगठा तुटला असेल ? परवाच बाबांनी नवीन चप्पल आणून दिली.' असं मनाशीच पुटपुटत त्यानं चप्पल नीट निरखून पाहिली, तर त्याला विजेचा शॉक लागल्यागत धक्काच बसला. कारण धाकट्या बहिणीची एक चप्पल व स्वतःची एक चप्पल अशा विजोड चपला त्यानं घातल्या होत्या. त्यानं इकडेतिकडे पाहिलं. आपल्याकडे कोणाचीच नजर नाही असं पाहून त्यानं हातामध्ये चपला घेतल्या आणि पुढे चालू लागला. पायाऐवजी हातात चपला आणि त्याही विजोड हे पाहून त्याची त्यालाच लाज वाटू लागली. कसाबसा तो दुकानात पोहचला व दुकानदारास तेल मागितले.

"तेलाला भांडं ?" दुकानदारानं विचारलं.

"अरेच्या ! गडबडीमध्ये विसरलोच की !" असं म्हणत तो पुन्हा घरी आला. तेलासाठी डबा घेऊन दुकानाकडे जाणार तोच पावसाची एक सर आली, म्हणून त्यानं सोबत छत्री घेतली. दुकानात पोहोचल्यानंतर त्यानं तेल घेतलं.

"पैसे ?" दुकानदारानं प्रश्न केला. "पैसे आणायला तर पार विसरलो बुवा." असं म्हणत त्यानं पुन्हा घरी जाऊन पैसे आणले.

विसरभोळेचे पाय चिखलात भरले होते. घरी आल्यावर अंगणात त्याचा पाय घसरला व तो चक्क उपडाच पडला. आईनं हे दृश्य पाहिलं व ती हसू लागली.

अकरा वाजले होते. शाळेची वेळसुद्धा झाली होती. त्यानं गडबडीनं जेवण आटोपलं व वह्यापुस्तकं थैलीत भरली. तो शाळेत जायला निघणार तोच पावसानं आपली करामत दाखवली. मग तो छत्री शोधू लागला.

"आई माझी छत्री कुठे ठेवलीस गं. लवकर शोधून दे पाहू, मला वेळ होतो आहे." तो आईला म्हणाला.

"अरे तूच ठेवली असशील कुठंतरी. नीट पहा बघू." या आईच्या वाक्यानं त्याच्या लक्षात आलं, की छत्री तर आपण दुकानात विसरलो ! विसरभोळे गोंधळून गेला. काय करावं आणि काय नाही हे त्याला काहीच समजेनासं झालं. भिजत भिजत तो शाळेकडे निघाला. वाटेत दुकानातून छत्री घेतली व एकदाचा शाळेत पोहोचला.

शाळा सुरू झाली. गुरुजी शिकवत होते. विसरभोळे आपल्या बाकावर जाऊन बसला. त्यानं आपल्या थैलीतून पुस्तकं वह्या बाहेर काढल्या आणि कपाळावर हात मारून घेतला. गडबडीत त्यानं छोट्या भावाची पुस्तकं आणली होती. गुरुजींनी आधीच्या दिवशी सर्व मुलांना गणित सोडवून आणायला सांगितलं होतं. "तर मुलांनो, तुम्ही सर्वांनी आपापल्या वह्या दाखवा बरं." असं म्हणून गुरुजी सर्वांच्या वह्या तपासू लागले. विसरभोळेची जेव्हा वेळ आली तेव्हा गुरुजी त्याच्यावर जाम संतापले व त्याला चांगलीच शिक्षा केली. वर्गातील सर्व मुलं त्याच्याकडे पाहून हसू लागली. त्याला स्वतःचा खूप राग येत होता.

दिवसामागून दिवस जात होते. मार्च महिना सुरू झाला. त्याची परीक्षाही जवळ येत होती. काही दिवसांतच परीक्षेचा दिवस उजाडला. त्या दिवशी तो देवाला नमस्कार करून शाळेत पेपर सोडवण्यासाठी गेला. तिथं गेल्यावर त्याच्या लक्षात आलं, की आपलं पेन घरीच राहिलं, म्हणून तो पळत पळत घरी आला. त्या वेळेस त्याची आई पाण्यानं फरश्या स्वच्छ करत होती. तो फरशीवरून धाडकन आदळून उलटासुलटा पडला. त्याच्या पायाला मोठी जखम झाली. त्यातून भळाभळा रक्त वाहू लागलं. त्याला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यात आलं. दवाखान्यात चांगला पंधरा दिवस राहिल्यानंतर त्याचा पाय बरा झाला. बिचाऱ्याची परीक्षा बुडाली, पण त्या दिवसापासून त्याला एक चांगली अद्दल घडली. तो प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवू लागला. कोणतंही काम काळजीपूर्वक करू लागला. दुसऱ्या वर्षी चांगला अभ्यास करून तो पहिल्या क्रमांकानं पास झाला. आता त्याला 'विसरभोळे' न म्हणता सर्वजण 'संजय' या नावानं ओळखू लागले.

रवींद्र व्ही. चालीकवार
संपर्क क्र. 9011559106

# वाचाल तर वाचाल...!

आधुनिक केसरी

माणसाचे जीवन फुलवण्यात पुस्तकांचा फार मोठा सहभाग असतो. त्यामुळे माणसाचे मन हे संकुचित विचारात अडकत नाही. माणसाला संकटावर मात करण्याची शक्ती ही वाचनातूनच मिळते.चांगली पुस्तके वाचल्याचा आनंद काही निराळाच असतो. कविता, कथा, लेख, कादंबरी यासारख्या साहित्य प्रकारातून मनाचे मनोरंजन होते, म्हणून माणसाच्या जीवनात चांगली पुस्तके व सज्जन माणसे लवकर भेटत नाही, ती जर वाचन करणाऱ्या माणसाला मिळाली तर माणसातील खरा माणूस व्यक्त होतो. कुणी कथा-कविता, लेख-कादंबरी यांच्या लेखनातून अनुभव आपल्या शब्दात ते शब्दबद्ध करतात. हेच लेखकांचे अनुभव वाचकांना समृध्द करीत असतात. कारण वाचनाने बुध्दीची चांगली मशागत होते.

वाचनाने आत्मविश्वास वाढतो आणि त्याचबरोबर भाषेचाही विकास होतो. वाचनाने ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात आणि व्यक्ती चिंतनशील बनते. अर्थात वाचनाने त्यांच्या वर्तनात सकारात्मक परिवर्तन घडून येते. पुस्तके हे ज्ञानाबरोबर आनंद देणारे एक साधन आहे. वाचन अनेकांच्या मनाला आकार देत असते. त्यांना सशक्त घडवत असते.

आजकालच्या पिढीला मनोरंजनासाठी पुस्तकांशिवाय दुसरा मित्र नाही. वाचन जर सक्षम असेल तर आपले लेखनही प्रबळ होते. एखादे पुस्तक माणसाच्या आयुष्याला कलाटणी देते, तर कधी कधी विचारात आणि वागण्यात आमुलाग्र बदल घडविते. त्यामुळे वाचन करणाऱ्याला एक जगण्याची नवी दिशा मिळते, ती केलेल्या वाचनातूनच. त्यासाठी भारताचे मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करतो. आपण दुसऱ्याचे आयुष्य समजून घेताना त्यांचे चुकणे- त्यांची नाती सांभाळणे, त्यांचे स्वतःला सावरणे, सहजतेने इतरांना क्षमा करणे. या गोष्टी आपल्या मनाला शिवून जाणाऱ्या असतात. पुस्तके वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आपली सोबत करतात. चांगल्या पुस्तकांची सोबत तर कित्येक दिवसांची असते. माणसाच्या एकटेपणात पुस्तकांसारखा जिवलग सहवास दुसरा कोणताच नाही.

मुले ही आपल्या देशाचे भवितव्य असल्याने ती बौध्दिक मानसिकदृष्टया सक्षम खंबीर असणे गरजेचे आहे. आणि ते वाचनातूनच साधता येणार आहे. त्यासाठी मुलामध्ये बालपणापासून पुस्तक वाचण्याची आवड निर्माण करायला हवी. मुले ही अत्यंत अनुकरणप्रिय असतात. ज्या घरातील जेष्ठ मंडळी सतत पुस्तक वाचन करतात, त्या घरातील मुलेही वाचनप्रिय असतात. पहिल्या दहा वर्षात होणारे मुलांचे संगोपन, त्यांच्यावर होणारे संस्कार मुलांच्या आयुष्यभर स्मरणात राहतात.

लहान मुले संस्कारक्षम असल्याने त्यांच्यावर वाचन- संस्कार करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी वृत्तपत्रे - वाचन व चित्ररूप गोष्टीचे पुस्तके मुलांना काही प्रसंगानिमित्त- वाढदिवस, सण, पुरस्कार, बक्षिस यानिमित्ताने दिले तर त्यांना पुस्तकांचे आणि वाचनाचे महत्व व आवड निर्माण होईल. मुलांच्या मित्रांनाही अशा भेटी दिल्यास त्यांना पुस्तकांची देवाण-घेवाणीसोबतच त्यांच्यात विचारांचे आदान-प्रदान करणे सहज शक्य होईल. मुलांना वाचनाची प्रबळ इच्छा असेल तर ई-बुक्स, ब्लॉग्स, ई- साहित्य या सारखे अनेक पर्याय आज सहज उपलब्ध आहे. आपल्याकडे असंख्य ग्रंथालये असून फिरती वाचनालयेदेखील आहे. ग्रंथप्रदर्शनी, पुस्तक मेळावे, पुस्तकांचे गाव भिलार, साहित्य संमेलने अशा ठिकाणी अत्यंत कमी दरात अनेक पुस्तके उपलब्ध असतात. पुस्तकांचा खजिना आपले ज्ञान भांडार संपन्न करतो, म्हणूनच, " वाचाल तर वाचाल ! " हे बीदवाक्य अगदी खरे आहे.

अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374



मुलांचा कलाविष्कार

शिवानी राजेंद्र सिमंत
सेंट लॊरेंस स्कूल, औरंगाबाद

## देवाने पंख दिले तर

देवाने पंख दिले तर
काय मजा येईन
विमानाप्रमाणे आकाशी
उंच झेप घेईन

देवाने पंख दिले तर
पक्ष्यांसंगे दोस्ती करीन
दूर दूर उडण्याची
पैज त्यांच्यासंग खेळीन

देवाने पंख दिले तर
बागेत उडत जाईन
आवडीप्रमाणे यथेच्छ
मधुर फळं खाईन

देवाने पंख दिले तर
शाळेला वेळेवर जाईन
छडी देणाऱ्या गुरुजींची
रोज शाबासकी घेईन

देवाने पंख दिले तर
आकाशी भरारी घेईन
ढगावरती बसूनी
चांदोमामाच्या गावी जाईन

-रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ
मो. 9011559106

## खोड...




हंपी झंपी उठलं कोण?
झोपित भिऊ घालतं कोण?
जाड्या नाही असंल
रड्या तुल नाही सोडणार
गड्या फटकन उडली नाकावर
धूळ झोप उडाली झाली
चुळबूळ चांगली तुझी जिरवतो
खोड फक्त खिडकी मोकळी सोड

## माझी माऊ...

माझ्या सोबत राहते माऊ
छान छान मऊ मऊ
खेळून झाल्यावर जागेवर मिळते
तिला दूध अन् मला खाऊ
झोप झाली डोळे उघडले
एकमेका पाहून घेऊ
खाडकन् वाजले घरात काही
शेपूट वर जसे नऊ
भूक लागता आम्ही करतो
घर भर गोंधळ म्याऊ म्याऊ

-बलराज संघई
संपर्क क्र. 9420015108





# मराठी चित्रपट, नाट्यक्षेत्राला समृद्ध करणार

## सुधीर मुनगंटीवार : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त कलावंतांचा केला सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रत्येकाचा हॅपिनेस इंडेक्स वाढविण्याची क्षमता असलेल्या महाराष्ट्रातील कलावंतांची, रंगभूमी व चित्रपट सृष्टीची भरभराट करण्यासाठी आणि या माध्यमातून चेहऱ्यावर हास्य फुलावे यासाठी सर्वंकष प्रयत्न करणार असे आश्वासन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज दिले. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व सह कलाकारांचा सुधीर मुनगंटीवार यांनी आज सन्मानपत्र देऊन सत्कार केला. यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते, कवि किशोर कदम, अक्षय बर्दापूरकर, दिग्दर्शक शंतनू रोडे आदी दिग्गज कलावंत यावेळी उपस्थित होते.
सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, यावर्षीच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराच्या यादीत मराठीने गौरवाचे स्थान मिळविले. या गुणी मराठी कलावंतांचा आज सन्मान करताना अभिमानाने उर भरून येत आहे. जगात भारत हा सर्वात सुंदर देश आहेच; सोबतच आमचा जन्म ज्या महाराष्ट्रात झाला ती मायभूमी गुणवान आणि कर्तुत्ववान आहे. दादासाहेब फाळके यामराठी माणसाने चित्रपट भारतियांसमोर आणला. पहिला चित्रपट देखील मराठी, राजा हरिश्चंद्र; त्यामुळे या क्षेत्रात मराठी चं मोठं स्थान आहे. श्यामची आई, सोंगाड्या, पिंजरा या चित्रपटांची परंपरा आणि वैविध्यता अतुलनीय आहे. ही परंपरा आपण कायम ठेवू, नाट्य मंदिरे उत्तम करुन रंगभूमी निश्चित संपन्न करु असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अभिनेते किशोर कदम, शंतनू रोडे यांनीदेखील मनोगत व्यक्त करुन सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्याचे अभिनंदन केले व हा सोहळा आयोजित केल्याबद्दल आभार मानले. आरोह वेलणकर यांनी संचालन केले.



# वाहनाअभावी बांधकाम विभागाची कामे खोळंबली

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** मागील वर्षी भोकर येथे जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता कार्यालय सुरू केले आहे. सहा तालुक्याचा कारभार याच कार्यालयातून सांभाळला जातो.कार्यक्षेत्राची कक्षा पाहता अधिका-यासाठी स्वतंत्र वाहनांची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे परंतु याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जातो आहे.एकवाहन कार्यालयाच्या प्रांगणात धुळखात पडून आहे. त्वरीत नव्याने वाहनांची सोय करून दिलासा द्यावा अशी मागणी आहे. जिल्हा परिषद हि मीनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाते. गावपातळीवरील विविध विकासात्मक स्वरूपाच्या कामासाठी लागणारी "रसद" पूरवठा केला जातो. नागरीकाना त्यांच्या कामासाठी थेट नांदेड गाठावे लागत होते हि "बेजारी" थांबवण्यासाठी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी नांदेड येथे कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता विभागाचे कार्यालय देगलूर आणि भोकर येथे सुरू केले आहे.त्यामुळे ग्रामपातळीवर कामे करणे सोयीचे झाले आहे. या कार्यालया अतर्गत भोकरसह, ऊमरी, हदगाव, हिमायतनगर, कीनवट, ऊमरी अशा सहा तालुक्याचा कारभार पाहिला जातो.एकूण तीन हजार कीलोमीटरचा प्रवास करून कामावर नियंत्रण ठेवावे लागते यासाठी अधिका-यांना स्वतंत्र वाहन असणे गरजेचे आहे.नेमक याबाबींकडे जाणीव पूर्वक कानाडोळा केला जातो आहे. एका वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती पण देखभाल दुरुस्ती अभावी ते वाहन कार्यालयाच्या प्रांगणात धूळखात पडून आहे. पूरेसा कर्मचारी वर्ग नाही अनेक पदे रिक्त आहेत तर संगणकाची व्यवस्था नव्हती ती येथील अधिका-यानी कशीबशी दूर केली आहे. मोठ्या अपेक्षेनी सदरील कार्यालय थाटले असल तरी विविध सूवीधाचा अभाव असल्याने अधिकाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे.संबधीत वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन त्वरीत सूवीधा द्यावे अशी मागणी जोर धरते आहे.

# राज्यातील रेशन दुकानदारांना लवकरच मिळणार फोर - जी पॉस मशीन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्य भरातील सर्व रेशन दुकानदारांना लवकरच फोर जी ई-पॉस मशीन उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन पुरवठा विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे यांनी अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक महासंघाला मंत्रालयात झालेल्या भेटी दरम्यान दिले.
जुन्या टू जी ई-पॉस मशीन त्रुटीमुळे धान्य वितरणप्रणाली विस्कळीत होत असल्याची बाब गंभीर असल्याने दुकानदारांना सुधारित फोर-जी पॉस मशीन देण्याबाबतची कार्यवाही व्हावी यासाठी रेशन दुकानदार आग्रही होते आणि त्यांना असे आश्वासन पुरवठा विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे यांनी दिल्यामुळे अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक महासंघाचे शिष्टमंडळ समाधानी असल्याचे संघटनेचे अध्यक्ष डी.एन. पाटील ज्येष्ठ उपाध्यक्ष राजेश अंबुसकर, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत यादव, सचिव विजयकुमार पंडित, योगीराज रहांगळे,गणेश डांगे आणि रमेश गांजापुरकर यांनी म्हटले आहे. डी.एन. पाटील म्हणाले कि, रेशनवरील धान्य वितरणात ई-पॉस मशीन अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. या मशीनवरच वितरणातील गती अवलंबून असताना या मशिन्सच्या त्रुटीमुळे दुकानदार अडचणीत आले म्हणून बुधवार ता.2 रोजी सायंकाळी मंत्रालयात सचिवांबरोबर बैठक झाली. यावेळी दुकानदारांच्या अनेक अडचणींवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार प्रधानमंत्री मोफत धान्य वाटपाचे कमिशन तातडीने देण्याच्या सूचना देण्यात येतील, तसेच नवीन फोर जी मशीन देण्यात येणार असल्यामुळे भविष्यात शिधा वाटपास अडचणी येणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला. ज्येष्ठ उपाध्यक्ष राजेश अंबुसकर यांनी दुकानदारांच्या भावना सचिवांसमोर मांडल्या. ऐन सणासुदीच्या काळात राज्यात मशीन बंद पडल्यामुळे धान्य असूनही दुकानदारांना वितरण करणे अवघड झाले आहे असे त्यांनी सांगितले.
धान्य गोदामातून वाहन निघताच त्या दुकानाच्या मशीनवर धान्य साठा टाकला जावा, अशी मागणीही त्यांनी केली. कोरोनाकाळात मृत्यू पावलेल्या दुकानदारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी कमिशन वाढीबाबत कॅबिनेट मंत्रिमंडळात चर्चा करण्यात यावी. 'आयएसओ' मानांकनाबाबत सक्ती करण्यात येऊ नये अशा मागण्या पुढे केल्या .

# महावितरणच्या अविश्रांत प्रयत्नांना यश एक हजार १३ विद्युत सहाय्यकांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** विद्युत सहाय्यक पदाच्या भरतीचा मार्ग मोकळा झाल्यानंतर महावितरणने मागील आठ दिवसात अविश्रांत परिश्रम घेत राज्यभरातील १ हजार १३ विद्युत सहाय्यकांना राज्यात विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमात आज नियुक्तीपत्रे देण्यात आली.
मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्रात झालेल्या 'महासंकल्प' या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महावितरणच्या १० विद्युत सहाय्यकांना नियुक्तीपत्रे देऊन या संकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ७५ हजार रोजगार देण्याचा संकल्प राज्य शासनातर्फे राबविण्यात येत आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित 'महासंकल्प' या कार्यक्रमात उर्वरित सर्व विद्युत सहाय्यकांना नियुक्तीपत्रे आज देण्यात आली आहेत.
कागदपत्रांची पूर्णतः पडताळणी करून पात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये अकोला परिमंडल - ५७, अमरावती परिमंडल - ३८ औरंगाबाद परिमंडल- ६२, बारामती परिमंडल- १४३, भांडुप परिमंडल - ८३, चंद्रपूर परिमंडल – २२, गोंदिया परिमंडल- ९, जळगाव परिमंडल - १०३, कोल्हापूर परिमंडल- १०४, कल्याण परिमंडल - ७८, लातूर परिमंडल - ७०, नागपूर परिमंडल - ३७. नांदेड परिमंडल - ३९, नाशिक परिमंडल - ७६, पुणे परिमंडल - ६० आणि रत्नागिरी परिमंडल- ३२ अशा एकूण एक हजार १३ उमेदवारांना विद्युत सहाय्यक या पदाची नियुक्तीपत्रे देण्यात आली. महावितरणच्या विभागीय स्तरावर या विद्युत सहाय्यकांची पदस्थापना करण्यात आली असून त्यांना तांत्रिक कामाचे प्रशिक्षणही देण्यात येईल.
महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक ( मासं/ प्रकल्प ) प्रसाद रेशमे, कार्यकारी संचालक अरविंद भादीकर यांच्यासह मानव संसाधन विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी मागील आठ दिवस अविश्रांत प्रयत्न करीत जास्तीत जास्त विद्युत सहाय्यकांना नियुक्तीपत्रे देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महावितरणने मुख्यालयापासून परिमंडल स्तरापर्यंत विद्युत सहाय्यक या पदाच्या उमेदवारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांनी कागदपत्रांच्या पडताळणीसाठी यावे, असे आवाहन करीत आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी त्यांना सहकार्य करीत राज्य शासनाचा 'महासंकल्प' हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात महावितरणने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# 'स्व'सोबत चालणारा माझा संवाद



प्रा. डॉ. संजीवनी तडेगावकर
अध्यक्ष, 17 वे राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन 2022

आधुनिक केसरी

**नरसी येथे संपन्न होत असलेल्या १७ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे उद्घाटक राजेश देशमुख कुंटूरकर, स्वागताध्यक्ष प्रकाशदादा भिलवंडे, या संमेलनाचे पूर्वाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक-विचारवंत आदरणीय प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, हे संमेलन जीवापाड निष्ठेने आयोजित करणारे मुख्य संयोजक ज्येष्ठ कथाकार मा. दिगंबर कदम, त्यांच्या हाकेला तितक्याच तत्परतेने 'ओ' देणारे त्यांचे आणि माझेही जीवलग स्नेही ज्येष्ठ साहित्यिक मा. देविदास फुलारी, मा. नारायण शिंदे, प्रा. धाराशिव शिराळे, ॲड. एल. जी. पुथड, सर्व पदाधिकारी व या संमेलनासाठी आवर्जुन उपस्थित कवी, समीक्षक, साहित्यिक, पत्रकार, वाचक, रसिक मित्र-मैत्रिणींनो!**

**17 वे राज्यस्तरीय लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन नरसी, ता.नायगाव, जि. नांदेड येथे शनिवार, दि. 5 नोव्हेंबर रोजी होत आहे. त्यानिमित्त अध्यक्षीय भाषणांचा सारांश**

असे म्हणतात की, जेव्हा वाणी मौन पाळते, तेव्हा मन बोलायला लागते, जेव्हा मन मौन धारण करते तेव्हा बुद्धी बोलू लागते आणि जेव्हा बुद्धी मौन पाळते तेव्हा आत्मा बोलू लागतो. आत्म्याने मौन धारण केले की 'स्व'शी संवाद होऊ लागतो. नेहमी असा 'स्व' सोबत चालणारा माझा संवाद आज मी इथे तुमच्याशी करू इच्छिते ! मी स्वतःला आज खूप भाग्यवान समजते. कारण ज्या प्रतिष्ठेच्या जागेवरून मला आज बोलायला मिळत आहे, त्या जागेला प्रतिष्ठा मिळवून देणारे माझ्या आधीचे सर्व सन्माननीय संमेलनाध्यक्ष खूप मान्यवर आहेत. पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मराठीतील महत्त्वाचे कवी आदरणीय विठ्ठल वाघ यांनी या संमेलनात पहिल्यांदा विचारांची पेरणी केली होती. त्यानंतरच्या प्रत्येक वर्षीच्या अध्यक्षांनी ही 'लोकसंवाद' ची भुई आपापल्या परीने मशागत करून कसदार केली आहे आणि त्याने आता ऐन तारुण्यात पदार्पण करताना मी आपल्यासमोर उभी आहे. त्या अर्थाने मी खरेच खूप नशीबवान आहे. त्यामुळे दिगंबर कदम यांचे सुरुवातीलाच खूप आभार! मित्रहो! हे संमेलन जाणीवपूर्वक ग्रामीण भागात भरवले जात आहे. यामागे संयोजकांचा काही एक दृष्टिकोन आहे. अर्थपूर्ण भूमिका आहे. तसेच संमेलनाच्या अध्यक्षाची निवड करताना दाखवलेला चोखंदळपणा कुणाच्याच नजरेतून सुटणारा नाही. ही सगळीच मंडळी ग्रामीण जीवन जाणिवा उरीपोटी घेऊन जगणारी आणि त्याबद्दल तळमळीने बोलणारी लिहिणारी आहेत. त्यामुळे संयोजकांच्या हरहुन्नरी चोखंदळ नजरेचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये इथे नोंदवणे गरजेचे आहे. ते म्हणजे मराठी साहित्याला समृद्ध करण्यामध्ये स्त्री साहित्याचे फार मोठे योगदान असून विविध वाङ्मय प्रकारांमध्ये स्त्रियांनी कसदार आणि उदंड लिहिले आहे. हे असे असतानाही त्यांची नोंद म्हणावी तशी घेतली जात नाही, हे दुर्दैव आहे. ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आपण नुकतेच उदगीर येथे घेतले. आतापर्यंत १५ वर्षांत कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष व अरुणा ढेरे या फक्त पाच लेखिका अध्यक्ष होऊ शकल्या. आणि लोकसंवादचे हे १७ वे साहित्य संमेलन आहे. तर इथे या संमेलनात प्रतिमा इंगोले, वृशाली किन्हाळकर, ललिता गादगे व संजीवनी तडेगावकर या चार लेखिका सन्मानपूर्वक अध्यक्ष झालेल्या आहेत. त्यामुळे असे म्हणायला हरकत नाही की, अखिल भारतीय महामंडळाला जे जमले नाही ते लोकसंवादने करून दाखवले. खऱ्या अर्थाने सर्वांना न्याय देणारे, स्त्री-पुरुष समानता जोपासणारे हे संमेलन आहे, याचा विशेष आनंद आहेच.

माझे आयुष्य ग्रामीण आणि नागरी अशा दोन कण्यात विभागले गेले. शेतकऱ्याची मुलगी असल्याने शेतीनिष्ठ अनुभवाच्या जीवनरसावरच माझ्या स्वभावाचा पिंड पोसला आहे. पुढे शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने जरी मी शहरात आले तरी अजूनही गाव माझ्या आत वस्तीला आहे. मला गावाकडच्या माती माणसांची ओढ आहे. गावच्या अभावग्रस्त परिसरात जगण्याला चिकटून असलेली चिवट माणसे माझ्या श्रद्धेचा आणि चिंतनाचा विषय आहे. जीवघेण्या संघर्षांच्या पडझडीत हिमतीने पाय रोवून उभी राहणारी करारी माणसे मला नेटाने भूमिकेवर ठाम राहण्याची उब पुरवतात. जिव्हाळ्याच्या गणगोतासाठी झिजणारी, दिल्या घेतल्या शब्दासाठी जागणारी, खेड्यातील जुनी माणसे, हळवी, भाबडी, लोण्यावानी मऊ माणसे मला चांगुलपणावर प्रेम करायला शिकवतात. कुत्सित, हेकेखोर, भांडकुदळ, दुष्ट, सापासारखी विषारी माणसे गावात नसतात, असे नाही. पण त्यांचे असणे तुलनेने कमी आणि दीनदुबळ्या, पीडित, शोषित, दुःखी कष्टी जीवांना, प्राणी, पशू-पक्ष्यांना 'या रे या रे सकल जन' म्हणत मायेने पोटाशी धरणारा आबादी आबाद गाव मी पाहिला आहे. तेथील आनंद, दुःख, वेदना, जल्लोष हे सगळे अनुभवत तृप्त समाधानाची साय मनावर पांघरून मी लहानाची मोठी झाले. रात्रीच्या शांत वेळी मंदिरातून गायल्या जाणाऱ्या भजनातील आर्त व्याकुळता आत कुठे तरी घर करून राहिली. तिथल्या निसर्गाने, लोकसंस्कृतीने, लोकलयीने माझ्या सृजनशील मनावर असे काही गारुड केले की त्याची झिंग अजूनही माझ्या लेखनीतून पाझरतेच आहे. लहानपणी दर रविवारी मी शेतात जायची. मला गाणे ऐकायची आणि म्हणायची फार आवड होती. त्यासाठी मी वयाच्या दहा-अकराव्या वर्षांपासूनच मंदिरात होणाऱ्या भजनाच्या कार्यक्रमात जात असे. तिथे वेगवेगळ्या अभंगांना आणि गवळणींना चाली लावून म्हणत असे. सगळे जण माझे खूप कौतुक करीत. मला भारी वाटे. नवनवी भजने म्हणायला प्रोत्साहन मिळे. धाकट्या मामाच्या लग्नात त्यांना एक रेडिओ मिळाला होता. तो ते गावीच ठेवून गेले होते. त्या काळात मी त्या रेडिओचा पुरेपूर वापर करत असे. खूप गाणी, मुलाखती, बातम्या सगळे सगळे ऐकत राहायचे. रेडिओवर निवेदन करणाऱ्यांचे आणि बातम्या सांगणाऱ्यांचे मला खूप अप्रूप वाटायचे. त्यांची लडीवाळ भाषा, बोलण्यातली सहजता, मधाळ-गोड आवाज, भाषेवरचे प्रभुत्व यामुळे मी खूप भारावून जात असे. कारण माझ्या आजूबाजूला जे आणि जसे बोलले जायचे ते फारच रांगडे आणि राकट असे होते. समोरचा व्यक्ती आपल्याशी प्रेमाने बोलतोय की रागाने हेच कळत नसे. इतके ते सगळे आरडून-ओरडून असे. मी बीड जिल्ह्याची, त्यामुळे तुम्ही कल्पना करू शकता! भाषेच्या आणि माणसांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची... तर मला रेडिओ एका वेगळ्या न पाहिलेल्या अशा सुंदर भावविश्वात घेऊन जायचा. आणि त्यामुळे मला जास्तीत जास्त त्याचा लळा लागला. मी तिकडेच लता - आशा मंगेशकरांचा गोड आवाज ऐकला. महानोरांच्या, खेबुडकरांच्या, नामदेव ढसाळांच्या, शांताबाईच्या इंदिरा संतांच्या कविता, गाणी ऐकली. आर्त स्वर, भावपूर्ण शब्द आणि मोहून टाकणाऱ्या अप्रतिम चाली ऐकल्या. त्या काळात मी सतत रेडिओ सोबत ठेवत असे. अगदी रविवारी शेतात जातानाही त्याला सोबत नेत असे. शेतातल्या घराच्या अंगणात बाभळीच्या झाडाला नाही तर उभ्या असणाऱ्या बैलगाडीच्या साठ्याला अडकवून दिवसभर मोठ्या आवाजात काम करता-करता ऐकत असे. 'आपली आवड' दुपारी बारा वाजता सुरू होई. त्यावर खूप छान मराठी गाणी वाजत. त्यात ना.धों. महानोरांचे 'जांभूळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजतो' किंवा 'माळ्याच्या मळ्यामंधी पाटाचं पाणी जातं, गुलाब जाई-जुई मोगरा फुलवित' अशी गाणी लागत. ती गाणी आणि माझ्या शेतातले चित्र एकजीव झालेले असे. त्यामुळे मला मनातून खूप आनंद होत असे. त्या आनंदाच्या भरात मीही मोठ्या आवाजात भान हरपून रेडिओसोबत ते गायची. आमच्या शेतात काम करणाऱ्या स्त्रिया, गडी माणसे कुतुहलाने काम सोडून ऐकत. माझ्या आवाजाचे खूप कौतुक करीत. दुपारच्या वेळी जेवणाच्या सुटीत त्या मला खूप छान जात्यावरची, लग्नातली गाणी म्हणून दाखवीत. मी त्यांना श्यामच्या आईच्या गोष्टी वाचून दाखवत असे. त्या ऐकून त्या गहिवरून येत. स्वतःच्या आठवणी, करुण कथा सांगून रडत. सगळे वातावरणच भावूक होऊन जाई. मग आई हळूच काही तरी गमती-जमती करून वातावरणातला ताण हलका करीत असे. शेतावर कामाला येणाऱ्या या सर्व गरीब, कष्टकरी महिला होत्या. त्यात कुणी गरीबाघरच्य सासुरवाशिण असत. त्यांच्या घरात खाण्या-पिण्याची आबाळ असे. दुपारच्या जेवणात त्या पातळ वरण, आमटी-भाकरी आणि ठेचा आणत. कधी-कधी तर शिळ्या भाकरीवर नुसताच ठेचा असायचा. त्यामुळे आई घरात दुसऱ्या- - तिसऱ्या दिवशी होणाऱ्या ताकाची कळशी भरून आणत असे. शिवाय दुपारच्या जेवणाआधी कुणा एकीला थोडे अगोदर पाठवून शेतातल्याच लावलेल्या भाज्यांतून ताजी भाजी घेऊन दारोज वेगळी भाजी बनवायला सांगत असे. त्यामुळे त्या सगळ्या जणी गरमागरम भाजीसोबतच ताक, खार, ठेचा, भाकरी शिवाय त्यांच्या भाज्यांसोबत मनसोक्त गप्पा आणि भरपेट जेवत असत. माझ्या आईच्या या कृतीचा माझ्यावर नकळत खूप परिणाम होत असे. आई असाक्षर आहे, पण तिने गरजूंवर आणि मुक्या प्राण्यांवर खूप प्रेम केले. अजूनही करते. शिक्षणाची तिला खूप आवड आहे. सर्वांनी खूप शिकले पाहिजे, असे तिला मनापासून वाटत असे. अगदी आजही तिच्या वयाच्या ८५ व्या वर्षीही तिला कुणी भेटले की ती त्याला मुलांच्या शिक्षणाबद्दल हमखास विचारते. माझे व्यक्तिमत्त्व घडवण्यात, कलागुणांना वाव देण्यात तिचा खूप मोठा वाटा आहे.

भावनेशी नातं जुळण्याच्या याच काळात मी वाचनाकडे वळले, ते मात्र जरा अपघाताने! झाले असे, एकदा दसऱ्याच्या निमित्ताने घराची साफसफाई, सारवणे-पोतेरा सुरू होते. घरातल्या सगळ्या वस्तू अंगणात काढून धुणे- पुसणे सुरू होते. त्यात एका पोत्यात कागद-पुस्तके आणि बरेच काय काय कोंबून ठेवलेले होते. 'मामाच्या कामाची कागदे असतील' म्हणून आई ते तसेच बांधून ठेवत असे. मी म्हटले, 'बघू काय काय आहे, म्हणून पोते खाली ओतले. तर त्यात बरीच जाडजुड पुस्तके होती. मी एक-एक हातात घेऊन पाहू लागले तर त्यावर छान-छान चित्रे होती, म्हणून मग मी आत उघडून पाहू लागले. थोडे वाचू लागले. तर त्यात छान ओघवत्या भाषेत गोष्टी होत्या. ज्या मी कधी वाचल्या ऐकल्या नव्हत्या. ना. स. इनामदार, रणजित देसाई, शिवाजी सावंत, वि.स. खांडेकर यांच्या, ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्या होत्या. मी वाचत बसले काम सोडून. पोताऱ्याच्या मातीने भरलेली पुस्तकांच्या आणि उतरंडीच्या गाडग्या- मडक्याच्या ढिगाऱ्यात बसून दिवस कधी मावळायचा कळायचेच नाही. आई रागाने ओरडू लागायची तेव्हा भानावर यायचे. मग ती सारी पुस्तके मी पोत्यातून काढून फडताळात रचून ठेवली. आता शाळेतून घरी आले की घरची कामे करताना रेडिओ ऐकणे आणि कामे आटोपली की पुस्तक वाचत बसणे, असा दिनक्रम सुरू झाला. एवढ्या लहान वयात एवढी जाडजूड पुस्तके मन लावून वाचताना कधी रडणाऱ्या, कधी हसणाऱ्या मला पाहून आईला अप्रूप वाटायचं. वाचनाने मला अधिकचे कळू लागले. मी शांत आणि स्थिर झाले. वाचणे, ऐकणे, काम करणे, अभ्यास करणे या आणि अशा कामात मी इतकी गुंतून गेले ती आजतागायत ! त्यात आता 'लिहिणे' हे अधिकचे समाविष्ट झाले. या सगळ्यात मी इतकी व्यस्त झाले की आयुष्यात कधी कंटाळा आला, बोअर झाले, काही सुचत नाही काय करावे, अशा गोष्टींना वेळच मिळाला नाही. हे करताना सुरुवातीला मी कधी कविता लिहीन असे वाटले नव्हते. पण खूप वाचले की खूप प्रश्न पडतात. मनात काही द्वंद्व निर्माण होतात. मीही त्याला अपवाद नव्हते.

मनाला टोचणाऱ्या, बोचणाऱ्या गोष्टींना मी वहीत लिहून ठेवू लागले. पुढे मैत्रिणींनी वाचल्यावर त्यांना ते आवडू लागले. हे वय होते पंधरा-सोळा वर्षांचे! पुढे वयासोबत विचारात प्रगल्भता येत गेली ती कवितेतून उतरत गेली. मी भारावून लिहीत राहिले. कधी योगायोगाने कधी तर कधी कार्यक्रमांतून ज्यांना अभ्यासत ऐकत मोठी झाले होते ते मधु मंगेश कर्णिक, पुरुषोत्तम पाटील, मंगेश पाडगावकर, उर्मिला पवार, हिरा बनसोडे, नामदेव ढसाळ, मल्लिका अमरशेख या कवी-लेखकांच्या प्रत्यक्ष भेटी होऊ लागल्या. तेव्हा लक्षात आले की हे कवी मला 'इतके जवळचे' का वाटत होते. नंतर महानोरदादांच्या अनेकदा भेटी होत गेल्या. एक अनौपचारिक नाते निर्माण झाले. पुढे त्यांनी माझ्या 'अरुंद दारातून बाहेर पडताना' या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहिली. एकदा अनौपचारिक गप्पांत वाड्मयीन वृत्ती-प्रवृत्तींबद्दल बोलताना आदरणीय महानोरदादा म्हणाले होते, 'तुला तुझ्या या वाड्मयीन प्रवासात अनेक छोट्या-छोट्या माणसांत 'मोठी' माणसे भेटतील आणि मोठ्या वाटणाऱ्या माणसांत 'छोटी' अनुभवायला येतील.' आणि खरेच, नंतरच्या काळात मला त्यांच्या या वाक्याची प्रचीती अनेकदा आली. अलीकडे गावात खूप बदल झालेत. गावाचा स्वभाव बदलला तसा गावाचा आणि नात्यागोत्यांचा चेहरा-मोहराही बदलला. सतत पाझरणारी पूर्वीची ओल आटत जाऊन मनात, शिवारात एक प्रकारचा रुक्ष कोरडेपणा आला आहे. कुचकामी शिक्षणातून निर्माण झालेल्या बेरोजगारीमुळे आशावादाची जागा निराशावादाने कधी घेतली काही कळलेच नाही. एकेकाळी सुकाळ असणाऱ्या गावावर आता सततच्या कधी ओल्या तर कधी कोरड्या दुष्काळाची चिंतातूर काळी छाया पसरून असते. ज्या झाडाच्या सावलीत शेतकऱ्याने बायको-लेकराबाळांसोबत चार-दोन सुखाचे घास घेतलेले असतात, त्याच फांदीला जीवजित्राबाच्या साक्षीने तो फाशी घेताना दिसतो आहे. यामागची तडफड, अस्वस्थता कुणालाच कशी समजत नाही? सरकारच्या निष्ठुर कारभाराने आणि निर्दयी सावकारांच्या तगाद्याने वेठीस धरलेला माझा मातीचा माणूस ढेकळासारखाच विरून चालला आहे. त्याचे हे विरून जिरून जाणे मला खूप कासावीस करते. कधीकाळी गावाची आब पदरात जपणाऱ्या मायमाऊल्यांचा पदर उघडा पडत जाणाऱ्या तिच्या संसाराला झाकताना अपुरा पडतोय. त्यात त्यांची होणारी दमछाक, घालमेल पाहून मी अस्वस्थ होते. आपण या त्यांच्या परिस्थितीत काहीच करू शकत नाही. ही असहायता, अगतिकता आपण दुबळे असल्याची जाणीव करून देते. हे वांझोटे लिहिणे काहीच कामाचे नाही! असेही वाटते कधी कधी ! आणि यातून सुटका करून घेण्यासाठी माझ्याजवळ पुन्हा कवितेशिवाय पर्याय नसतो कुठलाच मी लिहिते
'दुष्काळी दुःखात आटत जाते नात्याची ओल तेव्हा थोपवता येत
नाहीत पिकांचे झडते बहर आणि झाकताही येत नाही
तळ्याचा उघडा पडत जाणारा तळ चिमूटभर इच्छांना
उन्हाच्या झळा भाजून काढतात तेव्हा घडाभर पाण्याचं उसनं
अवसान तरी कुठून आणावं? निकराच्या संघर्षात
सुखाचं पुनर्वसन करता येत नाही कधीच माती सोडून स्थलांतर
करणाऱ्यांना हे कसं सांगावं?' उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी या न्यायाने एकेकाळी 'राजा माणूस' म्हणून असलेली शेतकऱ्याची ओळख पुसून जात आता 'वेठबिगार' ही त्याची होत असलेली नवी ओळख समाजासाठी आणि देशासाठी खूप मानहानीकारक आहे. पण व्यापारधार्जिण्या सरकारला हे कळणे शक्य नाही. असो. समाजप्रबोधन हे साहित्याचे मुख्य प्रयोजन जरी नसले तरी समाजातील विकृतीवर व्यंगावर भाष्य करताना नकळत साहित्यातून समाजप्रबोधन घडत असते. स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणादायी कालखंडामध्ये लिहिले गेलेले साहित्य शाहीर अमर शेख, अण्णाभाऊ साठे, दया पवार यांच्या कविता, पोवाडे, स्फूर्ती गीते, गाणी सर्वसामान्यांच्या मनात लढण्याचे बळ निर्माण करून प्रोत्साहित करणारी होती. त्यामुळे आजही प्रेरणादायी साहित्याचे संमेलन, लेखक-वाचक मेळावे भरायला हवीत. अशा प्रकारच्या संमेलनांतून साहित्यासोबतच सामाजिक, सांस्कृतिक प्रश्न गांभीयनि चर्चेत येतात. बदलत जाणाऱ्या समाजाच्या जीवन-जाणिवांचा अंदाज येतो. सुसंवाद, विसंवाद, मतांची मांडणी, विरोध, नकार असे साहित्यासाठी पोषक वातावरण निर्माण होते. शिवाय वाचक- रसिकांना साहित्यिकांच्या सहवासाचा आनंद मिळतो. अभिरुची निर्माण होण्यासाठी संमेलनांचा खूप फायदा होतो. तसेच त्या-त्या परिसरातील नव्याने लिहिणाऱ्यांना मोठ्या प्रमाणात संधी मिळते. त्यातून जे सकस, दर्जेदार असते ते कालांतराने इतर ठिकाणी पोहोचते. झोपलेल्यांना जागे करणे, बसलेल्यांना चालते करणे आणि विचार करणाऱ्यांना लिहिते करणे-बोलते करणे हेच तर साहित्य निर्मितीतील मुख्य तत्त्व आहे आणि ते अशा संमेलनांतून काही प्रमाणात का होईना साध्य होत असते. जोपर्यंत स्वतःच्या वृत्तीचा शोध स्वतःलाच लागलेला **क्रमश :**

# आदि इराणी, शिवा, रुपाली भारद्वाज, एकता जैन यांच्या उपस्थितीत त्राहि माम चा ट्रेलर लाँच

आधुनिक केसरी न्यूज

बिग बॉस फेम अर्शी खान, पंकज बेरी, सुमेंद्र तिवारी, आदि इराणी आणि एकता जैन यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या दिग्दर्शक दुष्यंत प्रताप सिंग यांच्या 'त्राहिमम' या हिंदी चित्रपटाचा टीझर आणि ट्रेलर मुंबईतील रेड बल्ब प्रीव्ह्यू थिएटरमध्ये लाँच करण्यात आला. यावेळी अनेक सेलिब्रिटी पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्यामध्ये प्रमुख पाहुणे राधे राधे बाबूजी, रोमिल चौधरी, अंजन भट्टाचार्य, लीना बोस, सुनील पाल, अभय शर्मा, अस्मा सय्यद आणि रुपाली भारद्वाज यांची नावे उल्लेखनीय आहेत. अचलेश्वर फिल्म्सच्या बॅनरखाली बनलेल्या या चित्रपटाचा टीझर आणि ट्रेलर प्रेक्षणीय आहे.
दिग्दर्शक दुष्यंत प्रताप सिंह यांनी सांगितले की, अत्याचाराची मर्यादा ओलांडली की दुःखाचे आवाज येतात. चित्रपटाची संकल्पनाही तीच आहे आणि म्हणूनच त्याचे शीर्षक त्राहिम असे ठेवण्यात आले आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये राजस्थानमधील रक्तपाताचा काळ दाखवण्यात आला आहे. गुन्हेगारी आणि गुन्हेगार, सत्ता, भ्रष्टाचार, शत्रुत्व, शोषण यांची कथा या चित्रपटात मांडण्यात आली आहे. चित्रपटातील अनेक संवाद संस्मरणीय आहेत. "सत्य माझे नाव आहे, मला खोटे आवडत नाही" असा संवाद आहे.



चित्रपटाचे निर्माते सुमेंद्र तिवारी म्हणाले की, लेखक सलमान जी यांनी ज्या प्रकारे त्राहिममची कथा माझ्यासमोर मांडली, ती मला खूप वेगळी आणि अनोखी वाटली. ही कथा कानपूरजवळील एका गावातील सत्यकथेवर आधारित आहे. जेव्हा आम्ही शूटिंग सुरू करणार होतो, तेव्हा शूटिंगच्या तीन दिवस आधी कोरोना आला. पण दुष्यंतचे अभिनंदन, त्याने हे चित्र मुंबईत कोरोनाच्या काळात चित्रित केले, त्याच्या मेहनतीला यश मिळो ही सदिच्छा.
दुष्यंत प्रताप सिंह म्हणाले की, राधे राधे बाबूजी आपल्यामध्ये यावे ही आपल्या सर्वांसाठी भाग्याची गोष्ट आहे. राधे राधे बाबूजी पहिल्यांदाच चित्रपटाच्या कार्यक्रमात आले आहेत. मला नेहमी पाठिंबा देणाऱ्या मीडियाचे मी खूप आभार मानू इच्छितो. मी एका साध्या कुटुंबातून आलो आहे आणि इथपर्यंत पोहोचलो आहे.
प्रमुख पाहुणे राधे राधे बाबूजी यांनी सांगितले की, दुष्यंत प्रताप सिंह यांनी महिला अत्याचाराच्या विषयावर जागरूक सिनेमा बनवल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. समाजाला आरसा दाखवण्याचे काम त्यांनी केले आहे. आजच्या काळात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे चित्रण त्राहिमाममध्ये करण्यात आले आहे. हा चित्रपट सुपरहिट होईल याची मला खात्री आहे.
अभिनेता रोमिल चौधरी म्हणाला की, दुष्यंत प्रताप सिंग वास्तववादी सिनेमा बनवतो, त्यात एक संदेशही असतो. दुष्यंत प्रताप सिंग यांच्या कारकिर्दीतील त्राहिम हा सर्वोत्कृष्ट चित्रपट असेल असे मला म्हणायचे आहे.
दुष्यंत प्रताप सिंह यांनी सांगितले की, त्राहिममध्ये 68 पात्रे आहेत. या चित्रपटात बबली अभिनेत्री अर्शी खानने चंपा नावाच्या मजुराची भूमिका साकारली आहे. हा चित्रपट अर्शी खानच्या काही सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक असेल. पंकज बेरी, आदि इराणी, मुश्ताक खान, एकता जैन यांच्यासह अनेक कलाकारांनी त्यांच्यासोबत उत्तम काम केले आहे.
अभिनेत्री एकता जैन हिने सांगितले की, दुष्यंतजीसोबत माझा हा दुसरा चित्रपट आहे. या चित्रपटात मी एका कडक वकिलाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाची निर्मिती सुमेंद्र तिवारी, नीतू तिवारी आणि फहीम आर कुरेशी यांनी केली आहे.

# पश्चिम घाट; प्रस्ताव 30 नोव्हेंबरपूर्वी केंद्रास पाठवा

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालयाने पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यासाठी विविध राज्यांकडून प्रस्ताव मागितले होते. महाराष्ट्राकडून वन विभागामार्फत यासंदर्भातील अंतिम प्रस्ताव 30 नोव्हेंबरपूर्वी केंद्र शासनास पाठविण्यात यावा असे निर्देश वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज दिले. पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्रासंदर्भातील अंतिम प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्यासंदर्भातील बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर,सर्वश्री आमदार विनय कोरे, प्रकाश आबिटकर, मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव विकास खारगे, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) वाय एल पी राव यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुनगंटीवार यावेळी म्हणाले की, जैवविविधतेच्या दृष्टीने पश्चिम घाटाचे जागतिक स्थरावर महत्व आहे. पश्चिम घाट महाराष्ट्रापासून दक्षिणेकडील केरळपर्यंत पसरला आहे. सह्याद्रीच्या रांगांसह मोठ्या प्रमाणात वनराईने नटलेला हा प्रदेश आहे. जवळपास 6 राज्यांशी संबंधित असणाऱ्या पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्रात महाराष्ट्रातील किती गावे येतात, किंवा किती गावे वगळयात यावी याबाबत पुन्हा एकदा अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यात यावा. राज्य शासनाकडून यापूर्वी 2018 आणि 2021 साली गावे वगळण्याबाबत व समाविष्ठ करणेबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र त्याला अद्याप केंद्र शासनाकडून मंजूरी मिळालेली नाही. त्यामुळेच महाराष्ट्रातील पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्र संबंधित आमदार आणि तज्ज्ञ, अभ्यासक यांच्याकडून याबाबत लेखी मते मागविण्यात यावी. तसेच आता तयार करण्यात येणारा प्रस्ताव 30 नोव्हेंबरपूर्वी केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. केंद्रीय पर्यावरण मंत्री यांच्याशी पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्र तसेच वन विभागातील विविध प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असून यासाठी त्यांची वेळ मागण्यात येईल असेही श्री. मुनगंटीवार यांनी योवळी सांगितले. पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्रात कोणतेही खाणकाम प्रकल्प, धरण प्रकल्प आणि वीज निमिर्ती प्रकल्पांना परवानगी देतानाचे निकषाचा अभ्यास करणे याला प्राधान्य देण्यात यावे. तसेच सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांचा स्थानिक पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य, परिसंस्था तसेच नैसगिर्क स्त्रोतांवर होणारा परिणाम याचा अभ्यास होणे गरजेचे आहे असे श्री. केसरकर यावेळी म्हणाले.डॉ. के. कस्तुरीरंगन समितीच्या अहवालानुसार पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत 10 मार्च 2014 रोजी प्रारुप अधिसूचना भारतीय राजपत्रात जारी करण्यात आली. सदर अधिसूचनेतील क्षेत्राची भौतिक पडताळणी करून क्षेत्र निश्चितीबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश केंद्र शासनाकडून राज्यांना देण्यात आले होते. पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत महाराष्ट्राचा अंतिम प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येणार आहे. या प्रस्तावात प्रामुख्याने कुठलेही क्षेत्र/गाव, प्रारुप अधिसूचनेतून वगळयाकरिता प्रस्तावित करताना तेथील जैवविविधता, वन्यजीव, वन्यजीव भ्रमण मार्ग, वने व पर्यावरणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे तसेच कोणत्याही परिस्थितीत त्यांचा ऱ्हास होणार नाही या मूलभूत तत्वाचे अनुषंगाने पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील वगळण्यासाठी प्रस्तावित गावांबाबत पुनर्विचार करण्यात येणार आहे.

# जिल्ह्याच्या गट सचिवांचे बहिष्कार आंदोलन सुरूच

## औरंगाबाद जिल्हा गट सचिव संघटनेची खुलताबाद येथे महत्वाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** राज्यातील गट सचिवाने विकास संस्थांच्या संगणीकरण. ताळमेळ. पत्रकाच्या कामगाजावर गेल्या १९ ऑक्टोबर पासून बहिष्कार. आंदोलन सुरूच आहे. औरंगाबाद जिल्हा गटसचिव संघटनेची तातडीची बैठक खुलताबाद येथे गुरुवारी (ता.३) झाली. खुलताबाद येथील शासकीय विश्रामग्रह येथे जिल्हाध्यक्ष मारुती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी एक वाजता बैठक घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र राज्य गटसचिव संघटनेच्या मार्गदर्शनाखाली जवळपास गेल्या बावीस दिवसापासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. सदर बैठक राज्य संघटनेच्या सूचनेप्रमाणे घेण्यात आली. राज्यातील गटसचिवाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन उदासीन दिसून येते. एकापाठोपाठ कामाचा भडिमार करत? आपल्या यंत्रणेला वेठीस धरले जात आहे. वर्ष..वर्ष. वेळेवर पगार होत नाही. पगार नसताना सुद्धा गटसचिव कर्मचारी काम करतात. त्यामध्ये आर्थिक हानी होऊन कर्मचाऱ्यांची मानसिक संतुलनही बिघडले आहे. शासन नवनवीन योजना आणत आहे. परंतु या सर्व योजनांच्या कामाची जबाबदारी गटसचिवांची असताना याच्या मूलभूत सेवा..वेतनाचा प्रश्न शासन जाणीवपूर्वक सोडत नाही? शासनाच्या आडमूड धोरणामुळे कर्मचारी धास्तावले आहे. राज्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीमध्ये कार्यरत असणाऱ्या गट सचिवाच्या सेवा व वेतनाचा प्रश्न प्रलंबित आहे. राज्यात ५ हजार ७६४ गटसचिव कर्मचारी आहे. चतुरश्रेणी कर्मचाऱ्यापेक्षा वेतन अत्यंत कमी असतानाही निलंबित करण्याचा सपाटा सुरूच आहे.संगणकीकरण कामकाजामध्ये पडताळणी पत्रकाचे काम व त्या अनुषंगिक सर्व कामे यावर राज्यभर बहिष्कार व असहकार करण्याचा निर्णय संघटनेने सुरू केलेले आहे. याबाबत. सहकार आयुक्त यांना निवेदन सादर केलेले .मात्र गेल्या महिन्यापासून सदरील आंदोलन सुरू होऊन देखील कुठल्याही प्रकारची दखल घेतली जात नाही .त्यामुळे या नंतर महाराष्ट्र राज्य गटसचिव संघटनेच्या वतीने मुंबई आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण तसेच धरणे आंदोलन सह संयुक्त आंदोलन करण्यात येणार आहे. त्या आंदोलनास औरंगाबाद जिल्हा गटसचिव संघटनेच्या वतीने संपूर्ण ताकदीनिशी सहभागी होण्यासाठी तसेच जळगाव जिल्ह्यातील एक गटसचिव बंधू ज्यांचे वेतन दिड वर्ष पासून बंद होते. त्यामुळे दिवाळीतील खर्च व आर्थिक विवंचनेतुनच कुटुंबातील या दडपणाखाली ह्रदयविकाराचा झटका येवून निधन झाले आहे . त्यांना श्रद्धांजली वाहुन त्या नुसार ठराव मंजूर करण्यात आला.
खुलताबाद येथे झालेल्या बैठकीत. जिल्हाध्यक्ष मा.श्री.मारुती तानाजी जाधव.सरचिटणीस व्ही.जे.लोखंडे.राज्य प्रतिनिधी पी.व्ही.हारदे. समिती सदस्य वाय.एम .दांडेकर.उपाध्यक्ष दौंड. कार्याध्यक्ष एस.एफ बैनाडे . गोराडे .घाटे ,फसाटे ,शिरसाठ जाधव ,सोनवणे ,बहादूरे ,गायकवाड साहेब,सुरकडर आदीसह बैठकीस औरंगाबाद जिल्हा गटसचिव संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# सावळदबारा येथे भव्य कुस्ती स्पर्धा


आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.८/११/२२ मंगळवार रोजी शालेशा बाबा उर्स निमित्ताने कुस्त्यांची भव्य दंगल ठेवण्यात आली आहे. दरवर्षी प्रमाणे भव्य कुस्त्याच्या मैदानाचे आयोजन करण्यात आलेले आहे,दरवर्षी सावळदबारा कार्तिंक पौर्णिमा नागोबा यात्रा व शाले शहा बाबा उर्स निमित्त कुस्तांची दंगल आयोजित करण्यात येते यात्रा व उर्स उत्सवानिमित्त भव्य कुस्त्याचे मैदान आयोजित करण्यात येत असते.पण मागील दोन वर्षांपूर्वी कोविडमुळे कुस्त्याचे मैदान आयोजित करण्यात आले नव्हते. मात्र, यावर्षी दरवर्षीप्रमाणे भव्य जंगी कुस्तांची दंगल आयोजित करण्यात आली आहे दि.७/११/२२सोमवार रोजी सायंकाळी सात वाजता शालि वस्ताद बाबांचे संदल निघणार आहे या संदल मधे हिंदू, मुस्लिम मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित असतात तर दि.८/११/२२ रोजी वार मंगळवार दुपारी एक वाजता कुस्त्याच्या मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कुस्त्याच्या मैदानासाठी महाराष्ट्रातून पुणे,नगर,जालना परभणी, जळगाव, बुलढाणा, चाळीसगाव,औरंगाबाद या राज्यातील विविध जिल्ह्यातून नामवंत मल्ल उपस्थित राहणार आहे.कुस्ती खेळताना स्वाताची जवाबदारी स्वातावर राहील पंचकमेटी जबाबदार राहणार नाही.तरी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशे आवाहन ग्रामस्थ व पंचकमेटीच्या वतीने मो.आरिफ मो.लुखमान उपसरपंच सावळदबारा यांनी केले आहे.

# के.ई.एम.रुग्णालय नर्सिंग वसाहतीत स्लॅब कोसळला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** के. ई. एम. हॉस्पिटलच्या आवारातील नर्सेस सेवा निवासस्थान धोकादायक बनली आहेत. गुरुवारी साडेनऊच्या सुमारास एका खोलीमधील स्लॅब कोसळून नर्सेस किरकोळ जखमी झाल्या. सुमारे 96 वर्ष जुन्या असलेल्या या इमारतींची अधून मधून केली जात होती. पण गेल्या काही वर्षापासून या निवासस्थानाची डागडुजी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या इमारती धोकादायक बनल्या आहेत. काही दिवसांपूर्वी एका खोलीमधील स्लॅबसह पंख्यापासून काही नर्सेस जखमी झाल्या होत्या. यात योगीता चव्हाण (वय 40) त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या दुर्घटनेनंतर स्थानिक माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांनी के. ई. एम. हॉस्पिटलला भेट देऊन, दुर्घटनेची पाहणी केली. प्रशासनाला अनेकदा सांगूनही कानाडोळा केला जात असल्याचा आरोप कोकीळ यांनी केला.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अंतरराष्ट्रीय कविता परिषदेत सहभागी कवी म्हणून माधुरी चौधरी यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ASIAN POETRY हा एक काव्य विषयक बृहत् प्रकल्प आहे. आशिया खंडातील सर्वच देश अमूर्त संस्कृतीने समृद्ध आहेत तसेच विविध भाषांमधील कवितांनीही समृद्ध आहेत. अशा विविध भाषिक कवींना एकाच मंचावर आणण्याचा प्रयास करणारा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे दक्षिण आशियाई देशातील कवितेचे समन्वयक, संचालक डॉ साहेब खंदारे आहेत.या प्रकल्पाचे कार्य तीन टप्यात असून पहिल्या टप्यात विविध भाषांमधील सहभागी कवींच्या कविता डॉ साहेब खंदारे यांच्या समीक्षेसह यु ट्यूब चॅनल वर प्रसारित होत आहेत. दुसर्या टप्यात सहभागी कवींच्या कवितांचा अनुवादित ग्रंथात समावेश केला जाईल. पहिल्याच निवड चाचणीत औरंगाबादच्या माधुरी चौधरी यांची निवड झाली आहे.माधुरी चौधरी यांच्याबरोबरच नागपूरच्या माधुरी आशिरगडे,वसमतच्या बालिका बरगळ,पुण्याच्या शांभवी बोधे व नेपाळचे चंद्र बोहरा यांचीही निवड झाली आहे.यासाठी माधुरी चौधरी यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद
सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# खोटे सांगाल तर विरोध करू

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाविकास आघाडीला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

महविकास आघाडी सरकारने अडीच वर्षे सत्तेच्या काळात काहीच काम केले नाही आणि आता भारतीय जनता पार्टी आणि बाळासाहेबांची शिवसेना युती सरकार काम करत असताना आघाडीतील घटक पक्ष खोटा नॅरेटीव्ह चालवून जाणीवपूर्वक चुकीची माहिती पेरत आहेत व युती सरकारची प्रतिमा खराब करत आहेत, असा आरोप भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केला. खोटे सांगाल तर भाजपाची संघटना रस्त्यावर उतरून विरोध करेल, असा इशारा त्यांनी दिला.

ठाणे जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासाच्या अंतर्गत ते भिवंडी येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, भाजपा ठाणे विभाग संघटनमंत्री हेमंत म्हात्रे, भाजपा भिवंडी जिल्हाध्यक्ष संतोष शेट्टी आणि आमदार महेश चौघुले उपस्थित होते.

मा. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सत्ता गमावल्यानंतर आघाडीतील घटक पक्ष सातत्याने चुकीची माहिती पेरून केंद्र सरकार आणि राज्य सरकारवर टीका करत आहेत. युती सरकारचे जाणीवपूर्वक नुकसान करून प्रतिमा खराब करत आहेत. पण भारतीय जनता पार्टीने कंबर कसली



आहे. खोटे सांगाल तर भाजपाची संघटना रस्त्यावर उतरून खोट्याचा विरोध करेल. महाविकास आघाडी सरकारने गेल्या अडीच वर्षात राज्याला बर्बाद केले, त्याबद्दलचे सत्य जनतेसमोर सांगू. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिबिरानंतर युती सरकार कोसळेल, असे भाकित त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी वर्तविले आहे, त्याविषयी एका पत्रकाराने प्रतिक्रिया विचारली असता मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, केवळ भाजपाला दूर ठेवण्यासाठी आणि सत्ता मिळवून भ्रष्टाचार करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्र आले होते. आता त्यांना ध्यानात आले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडे भक्कम बहुमत आहे. हे सरकार अधिकाधिक काम करेल, तसा या पक्षांमध्ये असंतोष उफाळून येईल. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करत आहेत, तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून कार्यकर्ते मा. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करत आहेत. यामुळे आपल्या कार्यकर्त्यांना थांबविण्यासाठी आणि आमदारांची अस्वस्थता कमी करण्यासाठी जयंत पाटील यांनी हे विधान केले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करण्यापूर्वी मा. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासाठी केलेले अफाट कार्य, त्यांची राज्याच्या विकासाची व्हिजन, त्यांनी केलेला त्याग आणि त्यांचे उत्तुंग नेतृत्व याचा विचार करावा तसेच आपली राजकीय उंची किती याचाही विचार करावा, असा टोला मा. प्रदेशाध्यक्षांनी एका प्रश्नाच्या उत्तरात हाणला.



# पेठ तालुका येथे भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे शाखा उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नाशिक जिल्ह्यातील पेठ येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्यूमन राईट्स मिशन इंडिया' या शाखा आफिसचे दि. 3/11/22 रोजी पेठ तालुका येथे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय प्रदीप पाटील बाबा खंडापुरकर बाबा यांच्या हस्ते शाखा उदघाटन करण्यात आले राष्ट्रीय समन्वयक मा. गिरीराज महिराष् सर जी, मा. गवारे बाबा संपर्क प्रमुख, रावणकुळे साहेब, महेश भाऊ, महिला जिल्हा अध्यक्ष शेख सनाताई शेख, पेठ तालुकापूर्व अध्यक्ष जनार्दन तुंबडे, पेठ तालुकापश्चिम अध्यक्ष भास्कर हाडस, रंजना गवळी ताई, प्रतिभा बोरसे ताई, कमल भोये, विद्या भोये, जगन दादा, विष्णू शिंदे, व पेठ तालुक्यातील सर्वच पदाधिकारी तीळभाट, शिंदेहट्टी, करजाळी व तसेच इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्यूमन राईट्स मिशन महिला जिल्हा अध्यक्ष / महाराष्ट्र युवती प्रदेश अध्यक्ष शेख सनाताई शेख,व पेठ तालुक्यातील संघटनेचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रब्बी हंगाम पूर्वतयारी सोयगाव तालुक्यात बीज प्रक्रिया मोहिमेस वेग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** रब्बी हंगाम बिज प्रक्रिया मोहिमेस आला वेग सोयगाव तालुक्यात एस जी वाघ सोयगाव तालुका कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वेग घेतला असून गावा गावात कृषि सहाय्यक बिज प्रक्रियेची प्रत्यक्षिके घेत असून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना दिसून येत आहे यात बियानास औषध बियाण्यास लावताना काळजी काय काळजी घ्यावी. कृ.स. ए.एस. बावस्कर,एस.एस.चव्हाण यांनी आपल्या शेतात बियाण्यास बिज प्रक्रिया केल्यानंतर बियाण्याची पेरणी करावी. असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कृषि सहाय्यक धनवट, जंगला तांडा,सोयगाव मंडळातील शेतकऱ्यांना केले.ज्वारी बियाण्याची बीजप्रक्रिया करतेवेळी बुरशिनाशक 4 ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे.जेणेकरून काणी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येणार नाही बियाणे जास्त ओले होणार नाही याची काळजी घ्यावी.20-25 मि.सावलीत वाळवावे.जिवाणू संघ 2.5 ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. एन.पी. के. स्थिर करणारे उत्पादनात 15-20% वाढ होते. ट्रायकोडर्मा हे बुरशीनाशक बुरशीना अटकाव निर्माण करते. अगोदर पेरणी केल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो.20.20.0.हे खत ज्वारीच्या पेरणी करताना वापरावे. जिवाणू संवर्धक व बुरशी नाशकांची एकाच वेळी किवा सोबत लावू नये. पेरणीच्या पूर्वी शिफारस केल्याप्रमाणे संवर्धकाची प्रक्रिया करून ताबडतोब पेरणी करावी असे कृषि सहाय्यक एस एस चव्हाण यांनी शेतकऱ्यांना सांगितले.विषारी औषध लावताना रबरी किवा प्लास्टीक हातमोजेचा वापर करावा.औषध नकात , तोंडात,डोळ्यात,जाणार नाही याची काळजी घ्यावी. बियाण्यास औषध लावण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हात,पाय,तोंड साबणाने स्वच्छ धोवावे. बुरशीनाशकाची प्रक्रिया केलेल्या बियाण्याला कोणत्याही खाद्य पदार्थ म्हणून उपयोग करू नये.यावेळी कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच,पोलीस पाटील व आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेंटिस्ट्रीची स्थापना

## अध्यक्षपदी डॉ. पंकज चिवटे, सचिवपदी डॉ. रत्नदीप जाधव, तर खजिनदारपदी डॉ. विजय ताम्हाणे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** डिजिटल क्रांतीमुळे जग दिवसेंदिवस झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञानाच्या अविष्कारामुळे श्रमकेंद्री व्यवस्था सोपी, जलद, परवडणारी आणि विश्वासार्ह बनत आहे. दंतवैद्यक क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणत आहे. अत्याधुनिक मशिनरी, विविध प्रगत संगणक प्रणाली, थ्रीडी प्रिंटिंग, स्कॅनिंग, रोबोटिक आदींचा उपयोग करून उपचार करणे शक्य झाले आहे. या प्रगत दंतवैद्यक उपचारांना अधिक लोकाभिमुख करण्याच्या, तसेच तंत्रज्ञानाधारित उपचार करणाऱ्या तज्ज्ञ दंतवैद्यकांना एकत्रितपणे काम करता यावे, या उद्देशाने इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्री (आयएसडीडी) या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीचे अध्यक्ष डॉ. पंकज चिवटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीच्या अध्यक्षपदी निवड झालेले डॉ. चिवटे पुण्यातील डिजिटल डेन्टिस्ट्रीमधील तज्ज्ञ आहेत. सचिवपदी ओरल



इम्प्लांटोलॉजिस्ट डॉ. रत्नदीप जाधव, तर खजिनदारपदी डेंटल इम्प्लांट्स अँड कॅड-कॅम डेन्टिस्ट्री तज्ज्ञ डॉ. विजय ताम्हाणे, सहसचिवपदी डॉ. केतकी असनानी, सह खजिनदारपदी डॉ. कौस्तुभ पाटील, वैज्ञानिक संचालकपदी डॉ. संजय असनानी, शिक्षण संचालकपदी डॉ. सुरेश लुधवानी यांची निवड झाली आहे. डॉ. रत्नदीप जाधव म्हणाले, दंतवैद्यक शास्त्रात होत असलेली डिजिटल क्रांती लक्षात घेता अशा असोसिएशनची गरज असल्याचे आम्हाला जाणवले. त्यातून सात डॉक्टरांनी एकत्र येत फेब्रुवारी २०२२ मध्ये कंपनी ॲक्ट अंतर्गत या संस्थेची स्थापना केली. अचूक, जलद आणि विश्वसनीय उपचार डिजिटल उपकरणांच्या वापराने शक्य होत आहे. भविष्यात दंतवैद्यक शास्त्र अधिक तंत्रज्ञानाधारित होणार आहे. त्यामुळे दंतवैद्यक आणि दंतवैद्यक शास्त्राचे विद्यार्थी यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने, तसेच जगभरातील नाविन्यपूर्ण, डिजिटल डेन्टिस्ट्रीचा प्रचार व प्रसार करून अत्याधुनिक उपकरणे बनवणाऱ्या कंपन्यांना व डॉक्टरांना एकत्र आणण्याचे काम असोसिएशन करणार आहे."

जगभरातील डिजिटल डेन्टिस्ट्रीमध्ये कार्यरत असणाऱ्या दंतवैद्यक यांची एक आंतरराष्ट्रीय परिषद पुण्यामध्ये घेतली जाणार आहे. इटली येथील कम्प्युटर एडेड इम्प्लांटॉलॉजी अकॅडमी (सीएआय, इटली) आणि ऑस्ट्रिया येथील इंटरनॅशनल अकॅडमी फॉर अल्ट्रासॉनिक सर्जरी अँड इम्प्लांटॉलॉजी (आयएयुएसआय, ऑस्ट्रिया) या दोन संस्थांनी शैक्षणिक सहकार्यासाठी सहयोग दिला आहे. त्यातून या क्षेत्रातील नवीन संशोधने, नवकल्पना व तंत्रज्ञान याचे आदानप्रदान होईल, असे डॉ. विजय ताम्हाणे यांनी नमूद केले.

# परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढले

## छत्रपती शिवाजी कॉलेच्या गौताळा व्हॅलीत घडला प्रकार : पालकांमध्ये तीव्र नाराजी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची गौताळा व्हॅंली या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शाळेची फी भरली नाही म्हणून शाळेतील नर्सरी पासुन ते १० वी पर्यत जवळपास ५० विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी घडला. कन्नड मध्ये शिक्षणाचे बाजारीकरण सुरू आहे कोंचिन क्लास वालेही पालकांना गोड गोड बोलुन प्रवेश देतात मात्र नंतर नेहमी फी साठी पालकांची व विदयार्थीची अडवणुक करून नेहमी अपमानीत करतात या कडे ही गांभीर्याने लक्ष दयावे अशीही चर्चा सुरू आहे .
या विद्यार्थ्यांना तब्बल दोन तास वर्गाबाहेर उभे केल्याने संतप्त झालेल्या पालकांनी स्थानिक पदधिका-यांच्या मदत घेतल्याने शाळा व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांत गुरुवारी जोरदार संघर्ष झाला. कन्नड येथील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची गौताळा व्हॅंली इंग्रजी माध्यमाच्या शाळेत नर्सरी ते १० पर्यत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये गरिब-गरजू , शेतकरी रिक्षावाल्यापासून मोठ्या श्रीमंतांपर्यतची मुले शिक्षण घेत आहेत. कधी भरमसाठ करण्यात आलेली फी वाढ आणि संस्थेने चालविलेल्या मनमानी कारभारामुळे येथील विद्यार्थी पालक त्रस्त झाले आहेत. कोरोना काळापासून थकित असलेल्या गरीब विद्यार्थी, पालकांना शाळेकडून सातत्याने अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. त्याविरोधात याआधीच पालक शिक्षक संघ आणि शाळा व्यवस्थापन यांच्यात संघर्ष सुरू आहे. यामध्ये आजच्या घटनेची भर पडली आहे. गुरुवारी सकाळीच शाळा सुरू होताच शाळेची फी भरली नाही म्हणून शाळेतील वर्ग शिक्षिकांनी नर्सरी ते १० वी तील जवळपास ५० विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढले. ज्याच्या पालकासोबत संपर्क झाला त्या विद्यार्थ्यांना वर्गात घेतले परंतु काही पालकासोबत संपर्क झाला त्या विद्यार्थ्यांना मात्र फी वसुलीसाठी विद्यार्थ्यांना दोन तास बाहेर उभे करत विद्यार्थ्यांना फी वसुलीसाठी अपमानित केले. यामुळे पालकांनी व स्थानिकच्या काही पदाधिका-यांनी थेट शाळेत जाऊन शाळा व्यवस्थापनालाच जाब विचारला. यामुळे पालक आणि शाळा व्यवस्थापन यांच्यात जोरदार संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाला. या कडे गटशिक्षण अधिकारी लक्ष देणार का सर्वाचे लक्ष लागले आहे कृष्णा निकम - अध्यक्ष गौताळा व्हॅंली कन्नड यांना दुरध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी फोन न घेऊन बोलण्यास टाळले.



**दिलीप शिरसाठ गटशिक्षणाअधिकारी**
फी साठी शाळेतुन विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढणे चुकीचे आहे . शाळेना जे काही नियम घालून दिले त्या पध्दतीने शाळेने फिस घ्यावी अन्यथा बॅक व्यवहार करून फी घ्यावी मात्र विद्यार्थ्यांना असे अपमानित करणे चुकीचे आहे . आमच्याकडे तक्रार पाप्त झाली आहे . आमचे विस्तार अधिकारी चौकशी करून अहवाल सादर करतील योग्य ती कारवाई होईल
**काकासाहेब कवडे ( माजी नगरसेवक कन्नड )**
मला शहरातील व खेड्यावरील विद्यार्थ्यांच्या पालकांचे फोन आले . आम्ही बाहेर असल्यामुळे आपण शाळेत जाऊन बघा . मी शाळेत गेलो तर मुल मोठ मोठ्याने रडत होती . मी त्यांना विचारले त्या विद्यार्थ्यांनी सांगितले किं, आज आमचे परीक्षा आहे तरी आम्हाला पेपर देत नसल्याचे सांगितले . जे पालक पैसे भरत नसतील त्यांना नोटीसा द्या, फोन करा, मॅंसेस करा फी साठी विदयार्थीची शैक्षणीक नुकसान करू नका .

# औराळा येथे नेत्र तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील औराळा येथे गुरुवार भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, भारतीय जनता पार्टी जिल्हा सचिव संजय गव्हाणे, भारतीय जनता पार्टी तालुका सरचिटणीस सुभाष काळे, जिल्हा परिषद सदस्य भारतीय जनता पार्टी सुरेश अण्णा गुजराणे, पंचायत समिती सदस्य भारतीय जनता पार्टी सुनील निकम भारतीय जनता पार्टी ओबोसी मोर्चा ता.उपाध्यक्ष प्रकाश निकम भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा उपाध्यक्ष माधव भोजने पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रामदास खवळे भारतीय जनता पार्टी कन्नड सोयगाव तालुका सरचिटणीस अनुसूचित जाती जमाती व डायमंडआय केअर मेडिकल फाउंडेशन यांच्या सह कार्याने नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी डॉ. साहिब अख्तर अंजली वानखेडे यांनी रुग्णांची नेत्र तपासणी करून गरजू रुग्णांना अल्प दरात चष्मे व डोळ्याचे ड्रॉप देण्यात आले व मोती बिंदू ऑपरेशन होणाऱ्या रुग्णांना औरंगाबाद इथे मोफत शस्त्रक्रिया करण्यास सांगितले या कार्यक्रमाच्या वेळी गावातील नागरिक सरपंच बागुल पोलीस पाटील सतीश भाऊ पगारे. उपसरपंच आकाश पगारे भारतीय जनता पार्टी कन्नड सोयगाव तालुका सरचिटणीस अनुसूचित जाती. भाजपा कार्यकर्ते प्रभाकर बागुल .औराळी गावचे प्रतिष्ठित नागरिक गोरख आबा निकम पाटील.भाऊसाहेब सोनवणे भाजपा कन्नड सोयगाव तालुका उपाध्यक्ष भटक्या विमुक्त जाती जमाती शेरोडी गावचे रामेश्वर बोरसे पाटील.भारतीय जनता पार्टी सक्रिय सदस्य कैलास भाऊ जाधव.पांडुरंग पगारे. वाल्मीक सोनवणे अंबादास खवळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# जंगलातांडा शिवारात जुगार अड्ड्यावर धाड

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील जंगलातांडा येथे पोलिस ठाणे फर्दापूर अंतर्गत मौजे जंगला तांडा शिवारात आयटीआय पाठीमागील असलेले कॉलेज परिसरामध्ये दोन ठिकाणी एकूण बारा आरोपी तिरट व झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत असतांना 20,990 रोख, 8,700 रुपयांचे पाच मोबाईल्स व 1,40,000/- रुपयांच्या एकूण चार मोटरसायकल इत्यादी मुद्देमालासह 1,69,690/- रुपयांच मुद्देमाल जप्त करुन एकूण 12 आरोपी विरुद्ध महाराष्ट्र जुगार कारवाई करण्यात आलेली आहे. पहिल्या रेडमध्ये आरोपी नामे 1) अनिल मिश्रीलाल राठोड, वय 32 वर्ष,रा जंगला तांडा 2) शेख शरीफ शेख शकुर वय 30 वर्ष रा सोयगाव 3) रविंद्र तुकाराम राठोड , वय 28 वर्ष, रा जगला तांडा 4) अर्जुन मनसुख राठोड वय 33 वर्ष,रा जंगला तांडा 5) चंद्रास लोटू रोकडे वय 66 वर्ष, रा आमखेडा सोयगाव 6) समाधान ओंकार राठोड वय 30 वर्षे सर्व रा.जंगला तांडा यांच्याकडे रोख रक्कम 8,910 रोख मोबाईल,03 किंमत अंदाजे 4000 मोसा 65,000 एकुण रुपये 77,910 चा मुद्देमाल मिळुन आला. तसेच दुस-या रेडमध्ये ईसम नामे 1) नंदलाल त्रंबक चव्हाण, वय 44 वर्ष,रा जंगला तांडा 2)गणेश पंडित कापरे वय 42 वर्ष रा सोयगाव 3)विष्णू गोविंदा मानकर , वय 44 वर्ष, रा सोयगाव 4) संदीप प्रल्हाद बिरारे वय 35 वर्ष,रा गलवाडा ता सोयगाव 5) राजेंद्र सुरेश काळे वय 48 वर्ष, रा सोयगाव 6) नामदेव श्रीचद चव्हाण वय 28 वर्षे रा.जंगला तांडा यांच्याकडे रोख रक्कम 12,080 रोख मोबाईल,03 किंमत अंदाजे 4,700 व मोसा 02 किंमत 75,000 एकुण रुपये 91,780 असा जुगार मुद्देमाल मिळुन आला. त्याच्यावर पो.स्टे. फर्दापूर येथे गु.र.नं. 152/2022 व 153/2022 कलम 12 महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कारवाई मा. पोलिस अधीक्षक साहेब श्री. मनीष कलवानिया साहेब व मा. उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विजयकुमार मराठे साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, पोउपनि कासले, पोलिस नाईक नीलेश लोखंडे, पोलीस अंमलदार आनंद पगारे, सतीश हिवाळे , भरत कोळी, प्रकाश कोळी यांच्या पथकाने केली आहे. सदरच्या कामगिरी मुळे फर्दापूर परिसरात ग्रामस्थाकडून फर्दापूर पोलिस ठाण्याचे कौतुक केले जात आहे.

# फर्दापूर येथे तांब्याच्या केबल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सपोनी डी.बी. वाघमोडे हे सिल्लोड उपविभागामध्ये रात्रगस्त करीत असताना त्यांना फोर्स ट्रॅक्स चारचाकी वाहन संशयितरित्या फिरत असल्याची माहीती मिळल्याने पंचासमक्ष चेक केले असता वाहन चकवा देते औरंगाबादच्या दिशेने वेगाने निघाले. त्यातील दोन ईसमांची विचारपूस केली असता अंधाराचा फायदा घेत दोघेजण पळून गेले. त्यांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. वाहनचालकास पकडून विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव अंकुश लक्ष्मण गरड, रा. नरापूर ता. पूर्णा, जिल्हा परभणी असे सांगितले. पंचासमक्ष सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये तांब्याची केबल 14 कॉपर बंडल वजन एकूण 291.400 KG यांची बाजारभावाप्रमाणे किंमत 160270 रु., काळ्या रंगाचा लोकरी 15 घोगड्या एकूण किंमत 7500 रु., 2 ओप्पो कंपनीचा मोबाईल किंमत 5000 रु.व जिओ फोन 700 रुपयांचा, फोर्स ट्रॅक्स पांढऱ्या रंगाची किंमत 10 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीविरूध्द गुरन 154)2022 कलम 122 क,124 मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास पोउपनी कासले यांचेकडे देण्यात आला. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया साहेब व उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार मराठे साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, पोलिस नाईक नीलेश लोखंडे, पोलीस अंमलदार सतीश हिवाळे, भरत कोळी, प्रकाश कोळी यांच्या पथकाने केली आहे.

# धोंडीरामसिंह राजपूत छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाड्याचे जेष्ठ साहित्यक वर्ष१९६७ पासून सातत्याने राज्यातील विविध वर्तमानपत्रात व मासिकात सातत्याने लेख, कविता, कथा, प्रासंगिक लिखाण करणारे तसेच वृत्तपत्र स्तंभ लेखक ज्यांची विविध विषयांवर ३५ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत, सध्या इयत्ता पाचवी इंग्रजी माध्यम अभ्यासक्रमात बैल पोळा कविता राज्यभर विद्यार्थी अभ्यासात आहेत, ज्यांना वैजापूर भूषण पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे असे सामाजिक कार्यकर्ते, स्वच्छतादूत, जलरत्न पुरस्कार प्राप्त झालेले व घराघरात स्वच्छता मंत्र पोहचून कोरोना काळात गोर, गरीबांना अन्न धान्य व जीवनावश्यक वस्तू पुरऊन त्यांना धीर देणारे ज्यांच्या या कार्याची दखल घेऊन झीन्यूज चॅनलने कोरोना योद्धा म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित केलेले असे वृक्षमित्र, पाण्याच्या वापरासाठी पाण्यासाठी जागर कविता लिहिणारे वैजापूर भूषण धोंडीरामसिंह राजपूत यांना नुकताच राष्ट्रीय स्तरावरील छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार"येथील पोलीस निरीक्षक साम्राटसिंह राजपूत, सभापती संजय पाटील निकम व पोलीस पाटील सूर्यकांत मोटे व शिव व्याख्याते शिवश्री प्रा. सतीश उखर्डे टेम्भुर्णीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. राजपूत कार्यक्रमचे उत्कृष्ट संचलन ही करतात, शासनाच्या वतीने लोकसभा, विधानसभा, जि.प. व,मनपाचे निवडणूक प्रशिक्षण ही अधिकाऱ्याना



देतात, शासनाच्या आमचे गावं-आमचा विकास कार्यक्रमात तालुक्यातील१६४ गावात जाऊन त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजना तळा गाळातिल घटका पर्यंत पोहचविल्या आहेत,जिजाऊ सेवाभावी संस्थेच्या वतीने त्यांना हा पुरस्कार मिळाल्याने सर्वत्र परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे. पोलीस निरीक्षक सम्राटसिंह राजपूत यांनी धोंडीरामसिंह राजपूत यानां स्मृतिचिन्ह व गौरवपत्र,शाल श्रीफळ देऊन सन्मानित केले.

# निमखेडी येथे कृषी विभागामार्फत लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्यास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील निमखेडी येथे सोयगाव कृषी विभागामार्फत लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मौजे निमखेडी तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद येथे सोयगाव तालुका कृषी अधिकारी एस. जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना व जनावरांना याचा खुप फायदे होणार आहेत.पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून रब्बी हंगामात गहू, हरभरा, भूईमूग व मका पिकांना याचा शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. व उन्हाळ्यात जनावरांना पाणी पिण्यासाठी उपलब्ध व्हावे याकरिता लोकसहभागातून कृषी विभागामार्फत तालुक्यात वनराई बंधाऱ्याचे काम हाती घेण्यात आले आहे.काही कामे चालू असून काही कामे पूर्ण झाली आहेत या कामी गावातील शेतकरी बंधूंनी कृषी विभागासोबत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा व भविष्यात होणाऱ्या पाणीटंचाईवर मात करता यावी यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ यांनी व्यक्त केली.

